www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले | उपसंपादक - श्री विलास गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश पाटील | सह संपादक - श्री मुकुंद कांबळे | महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३ | अंक : ७५ | रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514




# नवीन चार कामगार कायदे देशात लागू;
## डिजीटल माध्यमातील कामगारांचाही आहे समावेश

**नवी दिल्ली :** प्रत्येक कामगाराला सन्मान मिळावा यासाठी, केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयानं महत्त्वाची घोषणा जाहीर केली. देशात चार कामगार संहिता लागू करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सध्याच्या २९ कामगार कायद्यात बदल करण्यात आलं आहेत.

केंद्रीय कामगार मंत्रालयानं चार महत्त्वाच्या चार संहिता जाहीर केलेल्या आहेत. त्यामध्ये वेतन संहिता, २०१९, औद्योगिक संबंध संहिता, २०२०, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० आणि व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या परिस्थिती संहिता, २०२० यांचा समावेश आहे. यातून कामगार नियमांचं आधुनिकीकरण करण्यायत येणार आहेत. आत्मनिर्भर भारतासाठी कामगार सुधारणांना चालना देणाऱ्या हे धोरण करण्यात आलं आहे. त्यातून भविष्यासाठी मजबूत, लवचिक उद्योगांचा पाया रचला जाईल, असे रोजगार मंत्रालयानं म्हटलं आहे.



केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या माहितीनुसार देशातील अनेक कामगार कायदे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात (१९३०-१९५० च्या दशकात) तयार करण्यात आले होते. तेव्हा देशाची अर्थव्यवस्था आणि कामाचे स्वरुप पूर्णपणे भिन्न होते. त्यामुळे हे कायदे कालबाह्य ठरले आहेत. त्यामुळे कामगार आणि उद्योग यामध्ये अनिश्चितता निर्माण झाली आहे.

विकसित जगाशी जुळणारे मनुष्यबळ- चार कामगार संहितांची अंमलबजावणी करून आधुनिक जागतिक ट्रेंडशी जुळवून घेण्याची ही दीर्घकालीन गरज पूर्ण होईल. नवीन संहिता कामगार आणि उद्योग दोघांनाही सक्षम बनविले. त्यातून संरक्षित, उत्पादक आणि विकसित जगाशी जुळणारे मनुष्यबळ तयार होईल. त्यातून अधिक लवचिक, स्पर्धात्मक आणि स्वावलंबी राष्ट्राचा मार्ग मोकळा होईल.

विकसित भारताच्या ध्येयाला नवीन गती-केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी एक्स मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले, प्रत्येक कामगारासाठी सन्मान ही सरकारची हमी आहे.

आजपासून देशात नवीन कामगार संहिता लागू करण्यात आल्या आहेत. कामगारांसाठी वेळेवर किमान वेतनाची हमी, तरुणांना नियुक्ती पत्रांची हमी, महिलांना समान वेतन आणि आदराची हमी, ४० कोटी कामगारांसाठी सामाजिक सुरक्षेची हमी, एक वर्षाच्या नोकरीनंतर निश्चित मुदतीच्या कर्मचाऱ्यांसाठी ग्रॅच्युइटीची हमी, ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांसाठी मोफत वार्षिक आरोग्य तपासणीची हमी, जास्त काम केल्यास दुप्पट वेतनाची हमी देण्यात येणार आहे. अतिजोखमीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना १०० टक्के आरोग्य सुरक्षेची हमी, आंतरराष्ट्रीय मानकांनुसार कामगारांसाठी सामाजिक न्यायाची हमी सुनिश्चित करण्यात येणार आहे. या सुधारणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कामगारांच्या कल्याणासाठी उचललेले एक मोठे पाऊल आहे. आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल असून २०४७ पर्यंत विकसित भारताच्या ध्येयाला नवीन गती देणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले, सरकारने चार कामगार संहितांना लागू केल्या आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या सर्वात व्यापक आणि प्रगतीशील कामगार-केंद्रित सुधारणांपैकी ही सुधारणा आहे.

### काय आहेत सुधारणा

- ठराविक मुदतीसाठी घेतलेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कामगारांसारखेच सर्व फायदे मिळतील. यात रजा, वैद्यकीय आणि सामाजिक सुरक्षा यांचा समावेश आहे. पाच वर्षांऐवजी फक्त एका वर्षानंतर ते ग्रॅच्युइटीला पात्र ठरणार आहेत.
- गिग वर्क, प्लॅटफॉर्म वर्क आणि ॲग्रीगेटर्सची व्याख्या पहिल्यांदाच करण्यात आली आहे. ॲग्रीगेटर्सना वार्षिक उलाढालीच्या १-२ टक्के योगदान द्यावे लागेल. ते गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना देय/देय रकमेच्या ५ टक्के मर्यादित असेल. आधार-लिंक्ड युनिव्हर्सल अकाउंट नंबरमुळे कल्याणकारी लाभ सहजपणे उपलब्ध होतील.
- लिंगभेद कायदेशीररित्या प्रतिबंधित आहे. महिलांना पुरुषांप्रमाणेच समान वेतन मिळणार आहे.महिलांना रात्रीच्या शिफ्टमध्ये आणि सर्व प्रकारच्या कामात (भूमिगत खाणकाम आणि जड यंत्रसामग्रीसह) काम करण्याची परवानगी आहे. मात्र, त्यासाठी त्यांची संमती आणि सुरक्षा उपाय अनिवार्य असणार आहे. तक्रार निवारण समित्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अनिवार्य असणार आहे.
- सर्व कामगारांना किमान वेतनाची हमी आणि सर्व कामगारांना नियुक्ती पत्रे मिळतील.रजेदरम्यान वेतन देणे अनिवार्य करण्यात आले आहे. चांगले राहणीमान सुनिश्चित करण्यासाठी, कामगारांना केंद्र सरकारने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार वेतन मिळेल.
- सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० अंतर्गत येणारे सर्व एमएसएमई कामगार कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार पात्र आहेत. सर्व कामगारांसाठी किमान वेतनाची हमी असेल. कामगारांना कॅन्टीन, पिण्याचे पाणी आणि विश्रांती क्षेत्रे यासारख्या सुविधा उपलब्ध असतील.
- इलेक्ट्रॉनिक मीडियामधील पत्रकार, डबिंग कलाकार आणि स्टंट व्यक्तींसह डिजिटल आणि ऑडिओ-व्हिज्युअल कामगारांना आता पूर्ण लाभ मिळतील. सर्व कामगारांसाठी अनिवार्य नियुक्ती पत्र असणार आहे. त्यामध्ये त्यांचे पदनाम, वेतन आणि सामाजिक सुरक्षा हक्क स्पष्टपणे नमूद असणार आहे.

## सेंट जूड इंडिया चाइल्डकेअर सेंटर्सने खारघर येथे भारतातील सर्वात मोठे बालकर्करोग निवासस्थानचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर:** टाटा मेमोरियल सेंटरच्या ACTREC यांच्या सहकार्याने सेंट जूड इंडिया चाइल्डकेअर सेंटर्सने खारघर येथे होम अवे फ्रॉम होम' सुविधेचे उद्घाटन केले. ही १२ मजली, २३४ युनिट्सची इमारत टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांच्या उपस्थितीत उद्घाटित करण्यात आली. ही सुविधा दरवर्षी बालकर्करोगाशी सामना करणाऱ्या ७०० हून अधिक कुटुंबांना मोफत व स्वच्छ निवास उपलब्ध करून देईल. पुढील २० वर्षांत ही सुविधा अंदाजे १४,००० कुटुंबांना मदत करेल अशी अपेक्षा आहे.

बालकर्करोगाचे उपचार अनेक वर्षे चालू शकतात आणि त्यासाठी वारंवार फॉलो-अपची गरज भासते. उपचारासाठी हजारो किलोमीटर प्रवास करून मुंबईत येणाऱ्या कुटुंबांसाठी राहण्याची व्यवस्था करणे ही एक मोठी अडचण असते. सेंट जूड्समध्ये राहणाऱ्या कुटुंबांना त्यांचे मूल पूर्णपणे कॅन्सरमुक्त होईपर्यंत सुरक्षित राहण्याची हमी दिली जाते. ही नवी सुविधा कॅन्सरवर उपचार घेणाऱ्या कोणत्याही मुलाला सुरक्षित आणि काळजी



घेणारी राहण्याची जागा मिळालीच पाहिजे, या सेंट जूड्सच्या वचनाची साक्ष आहे. परवडणारी राहण्याची सोय नसल्यामुळे अनेक कुटुंबे उपचार अर्धवट सोडतात. ही सुविधा ते कमी करण्यात मोठी मदत करेल.

टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माहितीनुसार, सेंट जूड्सच्या केंद्रांमुळे उपचार अर्धवट सोडण्याचे प्रमाण २००० च्या सुरुवातीला ३०% पेक्षा जास्त होते, ते आता ५% पेक्षा कमी झाले आहे. या सुविधेत लायब्ररी, क्लासरूम, स्किलिंग सेंटर आणि 'सेंटर ऑफ एक्सलन्स' असेल, जे इतर स्वयंसेवी संस्थांना देशभरात 'होम अवे फ्रॉम होम' सारखी केंद्रे उभारण्यासाठी आणि चालवण्यासाठी प्रत्यक्ष प्रशिक्षण देईल.

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका' स्पर्धा ; नाशिक, जळगाव व कोल्हापूर या केंद्रांची प्राथमिक फेरी उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका' स्पर्धेचे यंदा १२ वे वर्ष असून त्या अंतर्गत राज्यातील प्राथमिक केंद्रांच्या प्राथमिक फेरीला प्रारंभ झाला. त्यानुसार नाशिक, जळगाव व कोल्हापूर या केंद्रांची प्राथमिक फेरी उत्साहात पार पडली.

नाट्य चळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्टये आहेत. या स्पर्धेत नवनवीन संकल्पना आणि दर्जेदार एकांकिका सादर होत असल्याने हा करंडक महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध झाला असून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत स्पर्धेचा आवाका वाढला आहे. गेल्या ११ वर्षांत स्पर्धेने नाट्यविश्वात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, सर्वोत्तम



स्पर्धास्थळ आणि दर्जेदार परीक्षणामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली आहे. नाशिक, जळगाव व कोल्हापूर या केंद्रांची प्राथमिक फेरी संपन्न झाली. कोल्हापूर केंद्रामधील आर्टस कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज नागठाणे च्या 'सोयरीक', राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय इस्लामपूरच्या 'हाफवे', तर नाशिक व जळगाव केंद्रातून वसंतराव नाईक कला व समाज विज्ञान शाखा नागपूरच्या 'वि. प्र. ' आणि अभिनय नाट्य कला लोंढे चाळीसगावच्या 'गाईड' या एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. या प्राथमिक फेरीसाठी परीक्षक प्रमोद शेलार व राजा अत्रे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, मोल खेर, गणेश जगताप, चिन्मय समेळ आदी उपस्थित होते. या नंतर आता पुढील पुणे, रायगड, मुंबई या केंद्रांची प्राथमिक फेरी संपन्न होणार असून महाअंतिम फेरी ५, ६ आणि ७ डिसेंबर रोजी पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. स्पर्धेतील अंतिम फेरीतील विजेत्या प्रथम क्रमांकास एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, तसेच इतर पारितोषिके देऊन कलाकारांना गौरविण्यात येणार आहे.

## खारघर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** अतुल म्हात्रे ग्लोबल लर्निंग आणि रिसर्च सेंटर यांच्यातर्फे खारघर विभागातील युवक युवतींसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन 28 नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता करण्यात आले आहे.या मेळावा साठी शैक्षणिक पात्रता आठवी ते पदवीधर, आयटीआय फिटर, वेल्डर, सीएनसी मेकॅनिस्ट, इलेक्ट्रिशन, डिप्लोमा इंजिनियर असणार आहे. यासाठी आधार कार्ड, पॅन कार्ड आवश्यक आहेत. सत्याग्रह कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय थारवाणी हेरिटेज, प्लॉट क्रमांक २४, सेक्टर सात, खारघर येथे हा मेळावा होणार आहे. या मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन अतुल नंदकुमार म्हात्रे यांनी केले आहे.




## स्वच्छता दूत फाऊंडेशन ने साजरा केला वर्ल्ड टॉयलेट डे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : जागतिक टॉयलेट दिनानिमित्त १९ नोव्हेंबर २०२५ रोजी स्वच्छता दूत फाउंडेशन तर्फे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर मानखुर्द मुंबई येथे स्वच्छता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात शौचालय या विषयावर चित्रकला स्पर्धा, तसेच स्वच्छते वरील गाणी आणि हात धुण्याच्या योग्य पद्धतींचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी सादर करत टॉयलेट स्वच्छता जनजागृती केली.

आराधना समाधान घुले या ७ वी च्या विद्यार्थी ने स्वच्छते वरील गाण्याने कार्यक्रमाची सुरुवात केली. अशीता आंद्रेश गायकवाड हिने जागतिक टॉयलेट दिवस या विषयावर छायाचित्रे काढून त्याचे महत्व मांडले आणि हात धुण्याची पद्धत समजावून सांगितली.

कार्यक्रमात मनपा स्वच्छता अधिकारी आनंद जगताप,




जीवन ज्योत कॉन्व्हेंट स्कूलचे प्रमुख सचिन सर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगरचे अध्यक्ष गुलाब अण्णाभाऊ साठे, ज्योतिका सिस्टर, समाज प्रबोधन कार्यकर्ते सतीश भोसले, स्वच्छता संवर्धन संस्था महासंघाचे अध्यक्ष व सचिव सुरेश साळवे , पत्रकार विनोद कांबळे, डॉ. जमीला बेगम, शबाना अहमद, पुष्पेंद्र नामदेव ट्रेनर, जितेंद्र साळी समन्वयक एस डी एफ तसेच महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त उत्तम रणपिसे यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे आयोजन स्वच्छता दूत फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक मुकेश पाखरे यांनी केले व जगभरात सुरू असलेले टॉयलेट दिनाचे महत्व सांगताना स्वच्छता मनाची, स्वच्छता घराची, स्वच्छता परिसराची, स्वच्छता देशाची व जगाची राखली तर आरोग्य व्यवस्था चांगली राहील असे सांगितले.

## रायगडमध्ये धुतूम ग्रामपंचायतीचा विकासकामांचा धमाका !; महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते विकासकामांचे उद्घाटन!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : "धुतूम गावची जिल्हा परिषद शाळा सुसज्ज आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी ग्रामपंचायतीने हाती घेतलेले काम अभिमानास्पद आहे. राजकीय इच्छाशक्ती असेल तर सर्व काही शक्य आहे. हे धुतूम ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच सुचिता ठाकूर, उपसरपंच आणि सदस्यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळेच उरण तालुक्यातील धुतूम ग्रामपंचायत सध्या रायगड जिल्ह्यात विकास कामांत अग्रेसर आहे. ग्रामपंचायतीचे पदाधिकारी एकदिलाने काम करत आहेत. विकास कामांत राजकीय चपला बाहेर ठेवून काम करण्याची ग्रामपंचायतीची भूमिका कौतुकास्पद आहे. उद्योजक पी. जी. शेठ ठाकूर, माजी आमदार मनोहर भोईर यांची सहकार्य करण्याची वृत्ती महत्त्वाची आहे. त्यामुळे धुतूम ग्रामपंचायतींचा विकास कामांचा धडाका आणि नावलौकिक कायम राहील," असा विश्वास आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी धुतूम येथे व्यक्त केला.ते म्हणाले, "मी माणुसकी भावनेने 'सुखकर्ता' वरून मदतीचा अखंड प्रवाह सुरूच ठेवला आहे. दिनदुबळ्यांची सेवा, मदत ही खरी ईश्वर सेवा, हे मला माझ्या आई-वडिलांनी शिकविले आणि तोच धर्म मानून मी काम करतोय.""इंडियन ऑईल अदानी व्हेंचर, अल्ट्रा टेक सिमेंट कंपनी, सी-बर्ड यांसारख्या कंपन्या आणि त्याचा अधिकारी वर्ग गेली अनेक वर्षे सहकार्याची भूमिका घेऊन धुतूम ग्रामपंचायतीला मदत करीत आहेत. त्यामुळे विकासकामांना गती मिळाली आहे. त्याबद्दल अधिकारी वर्गाचे अभिनंदन," असेही यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले.

"उरण तालुक्यात काम करीत असताना महेंद्रशेठ



घरत यांची उत्तम साथ आम्हाला मिळतेय. धुतूम ग्रामपंचायतीला जेएनपीटीचा सीआरएस फंड मिळालाच पाहिजे, यासाठी मी आणि महेंद्रशेठ प्रयत्न करू," असे माजी आमदार मनोहर भोईर यावेळी म्हणाले. धुतूमच्या जिल्हा परिषद शाळेत अत्याधुनिक संगणक कक्षाचे उद्घाटन, पिण्याच्या पाण्याची नवीन पाईप लाईन, अत्याधुनिक कापडी पिशव्या मशीनचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि उद्योजक पी. जी.शेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धार्मिक स्थळ सुशोभीकरण अंतर्गत साहित्य वाटप धुतूम ग्रामपंचायतीच्या वतीने शनिवारी करण्यात आले. यावेळी धुतूमच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत आणि शिवरायांची महती सांगणारे गीत गायले. यावेळी सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता. यावेळी गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती उरण निर्मला घरत, रामकृष्ण घायल वरिष्ठ महाव्यवस्थापक अल्ट्राटेक, इंडियन ऑईल अदानी व्हेंचरच्या वरिष्ठ अधिकारी नाझनीन शेख, सतीश म्हात्रे, एचआर संदीप काळे, प्रफुल्ल म्हात्रे, सीबर्डचे वैभव कदम, सरपंच सुचिता ठाकूर, उपसरपंच सुचिता कडू, सदस्य स्मिता ठाकूर, कविता पाटील, करिष्मा ठाकूर,अनिता ठाकूर, रविनाथ ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, प्रकाश ठाकूर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केशवनगर येथे श्री बालाजी महोत्सव व भव्य यात्रेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रिसोड. रणजितसिह. ठाकूर :** तालुक्यातील केशवनगर येथे गेल्या 34 वर्षापासून सुरू असलेला अखंड हरिनाम सप्ताह मौजे केशवनगर येथे दिनांक 28 नोव्हेंबर शुक्रवार ते 5 डिसेंबर 2025 शुक्रवार पर्यंत श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केशवनगर गावकऱ्यांनी केले आहे श्री बालाजी सहकारी साखर कारखाना मर्यादित केशवनगर यांचे आकर्षक प्रांगणात दिनांक 28 नोव्हेंबर 2025 ते 5 डिसेंबर 2025 पर्यंत श्री बालाजी महोत्सव व भव्य यात्रेचे आयोजन केले आहे श्री बालाजी मानव सेवा चॅरिटेबल ट्रस्ट माननीय सुनील बाबासाहेब धाबेकर व यात्रा महोत्सव कमिटी केशवनगर यांचे मार्गदर्शनाखाली होत आहे आमचे येथे सालाबाद प्रमाणे श्री बालाजी भगवानांच्या कृपेने श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचे आयोजन केले असून महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनांची मेजवानी व भाविक भक्तांची भूक भागविण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली आहे तरी कृपया भाविक भक्तांनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा व आपल्या पदरी पुण्य पाडून घ्यावे आणि कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे ही केशवनगर गावकऱ्यांची आग्रहाची विनंती आहे दिनांक 28 नोव्हेंबर शुक्रवार रोजी रात्री साडेआठ



वाजता प्रताप महाराज खोटे केशवनगर यांचे कीर्तन होईल 29 नोव्हेंबर शनिवार रोजी श्री हरिप्रसाद राघोजी महाराज अवगन पिंपरी यांचे कीर्तन होईल रविवार 30 नोव्हेंबर 2025 ह भ प मंगेश महाराज घुगे राजुर गाव आळंदी यांचे कीर्तन होईल सोमवार 1 डिसेंबर ह भ प राम महाराज चांदणे मुंदेफळ बुलढाणा यांचे कीर्तन होईल मंगळवार 2 डिसेंबर ह भ प सुरेश महाराज हिरळकर सस्ती वाडेगाव यांचे कीर्तन होईल बुधवार 3 डिसेंबर ह भ प विजय महाराज सुळे करंजी मालेगाव यांचे कीर्तन होईल गुरुवार ४ डिसेंबर ह भ प भगवान महाराज सातगावकर यांचे कीर्तन होईल 5 डिसेंबर शुक्रवार सकाळी दहा ते बारा पर्यंत लक्ष्मण महाराज देशमुख आळंदी देवाची यांचे काल्याचे किर्तन होईल दररोज भागवत ग्रंथाचे सुश्राव्य वाचन श्री हरी कृपाप्रसाद ह भ प राघोजी महाराज अवगन पिंपरी यांच्या मधुर वाणीतून सकाळी नऊ ते बारा व दुपारी दोन ते पाच भागवत कथेचे वाचन होईल सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ मधुकर महाराज अवचार ज्ञानानंद वारकरी शिक्षण संस्था कोठा यांच्या विद्यार्थ्यासहित हरिपाठ होईल रात्री साडेआठ ते साडेदहा नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन सेवा दररोज होईल या सुवर्णसंधीचा परिसरातील भाविक भक्तांनी सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा

# प्रभाग क्रमांक १० परिवर्तन विकास आघाडीच्या प्रचारास प्रारंभ

## उमेदवार उबेद पटेल, दर्शना आंग्रे ,मेघा वाडकर यांना जनतेचा वाढता पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**खोपोली वार्ताहर :** शिळफाटा ग्रामस्थांचे आध्यात्मिक एकतेचे श्रद्धा स्थान रुपी असलेले श्री. हनुमान मंदिरातून प्रभाग क्रमांक १० खोपोली परिवर्तन विकास आघाडीच्या प्रचाराचा नारळ नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉक्टर सुनील पाटील यांच्या हस्ते फोडण्यात आला. यावेळी प्रभागातील जनतेतील लोकप्रिय उमेदवार उबेद पटेल, दर्शना आंग्रे ,मेघा वाडकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते यावेळी मोठ्या उत्साहात प्रचार रॅलीमध्ये आपल्या अनेक समर्थकांसह उपस्थित होते . या ठिकाणी उमेदवारांनी श्री.छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून प्रचार रॅली ची सुरुवात



शहाणी आली ,मोहल्ला,आयशा कॉम्प्लेक्स,शंकर मंदिर रोड परिसरात जोरदार घोषणाबाजी करून पार पाडली. यावेळी स्थानिक जनतेने उमेदवारांना निवडणुकीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत औक्षण, आरती, मान ,सन्मान देत आपला हि सकारात्मक प्रतिसाद दर्शविला . डॉ. सुनील पाटील यांचा बालेकिल्ला समजणाऱ्या या प्रभागा मध्ये नगरसेवक पदाच्या उमेदवारांना त्यांच्या लोकप्रियता व जनसंपर्काचा नक्कीच मोठा फायदा होईल अशी चर्चा नागरिकां कडून व्यक्त केली जात आहे .यावेळी परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार जनतेच्या आग्रहा खातीर त्यांच्या पसंतीने दिले असून त्यांचे महत्वपूर्ण योगदान या प्रभागासाठी उल्लेखनीय आहे असे सांगितले . पालिका प्रशासनाचा दांडगा अनुभव असलेल्या मेघा वाडकर , उमेद पाटील यांच्या रूपाने लोकाभिमुख जनसेवेचा वसा पुढे चालवत असलेल्या पाटील कुटुंबीयांच्या साहाय्याने प्रभागात बैठकीचे हॉल कडे जाणारा रस्ता ,शंकर मंदिर रोड तसेच अनेक मूलभूत सुविधा पुरविताना त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले तर युवती म्हणून उच्चशिक्षित असलेल्या दर्शना आंग्रे यांना महिलांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एकमताने प्रतिसाद मिळत असल्याचे डॉ. सुनील पाटील यांनी आपल्या प्रतिक्रियेतून सांगितले.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते संतोष भाई जंगम चिटणीस किशोर पाटील दिनेश गुरव ,राजेश अंबानी तसेच माजी नगरसेवक कमाल पाटील,उद्योजक राजेंद्र साखरे तसेच हनुमान मित्र मंडळ , शीळ फाटा व्यापारी असोसिएशनचे सह स्थानिक ग्रामस्थ वाणी, आंग्रे, साखरे, फक्के, वाडकर,शहाणे, पटेल अश्या सर्व मित्र परिवार मोठया उत्साहाने या प्रचार रैलीत सहभागी होता.

डॉ. सुनील पाटील यांना शुभेच्छा देताना यंदाही नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासाठी सर्वाधिक मतदान शिळफाटा येथील नागरिकांच्या कडून दिले जाईल असे परिवर्तन विकास आघाडीच्या माध्यमातून सांगण्यात आले.

# ओबीसी प्रवर्गाचे अ, ब ,क, ड ,उपवर्गीकरण करून यातील अल्पसंख्यांक जातींनाही समान आरक्षण देऊन सामाजिक न्याय देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस साहेबांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ प्रमुख**

**अमरावती : दि २१ :** ओबीसी प्रवर्गाचे अ ,ब ,क ,ड, उपवर्गीकरण करून यातील अल्पसंख्यांक जातील नाही समान आरक्षण देऊन सामाजिक न्याय देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस साहेबांना महाराष्ट्र नाभिक महामंडळ यांच्या वतीने निवेदन देण्यात आले

आपणा सर्वांना विधीत आहेस की ओबीसी प्रवर्गामध्ये एकूण 345 पेक्षा अधिक जातींचा समावेश आहे. आणि या प्रवर्गासाठी मंडळ आयोगानुसार सामाजिक ,शैक्षणिक सेवाविषयक ,आणि राजकीय क्षेत्रात 27% आरक्षण लागू आहे. भारत देश स्वतंत्र झाल्यापासून/महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यापासून या प्रवर्गातील सामाजिक शैक्षणिक सेवाविषयक आणि राजकीय क्षेत्रातील 80% फायदे केवळ बहुसंख्येने क्रमांक एक वर असलेल्या एका जातीने आणि वीस टक्के फायदे बहुसंख्येने क्रमांक दोन आणि तीन वर असलेल्या दोन जातींनी घेतलेले आहेत. या प्रवर्गातील जवळपास 345 जातींपैकी तीन बहुसंख्यांक जाती वगळता उर्वरित 342 अल्पसंख्यांक जाती राजकीय शैक्षणिक सेवाविषयक आणि सामाजिक क्षेत्रातील सर्वच फायद्यांपासून आजही वंचित झालेले आहेत या अन्यायावर आजपर्यंत कोणत्या शासनाने उपाययोजना केलेली नाही म्हणून या 342 अल्पसंख्यांक जातीवर आज पर्यंत अन्याय झालेला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये उपवर्गीकरण मान्य केलेले आहे. त्यामुळे या अनुसूचीतील अल्पसंख्यांक जातींना न्याय मिळाला आहे अशाच प्रकारे अनुसूचित जमाती परगामध्ये सुद्धा अ ,ब ,क ,ड उपवर्गीकरण आधीच असल्याने या प्रवर्गातील अल्पसंख्यांक जातींना सर्वच सामाजिक क्षेत्रात वाटा मिळाला आहे व सर्व जातींची प्रगती होत आहे.

वरील प्रकारे ओबीसी प्रवर्गामध्ये सुद्धा बहुसंख्यांक अल्पसंख्यांक अति अल्पसंख्यांक आणि इतर असे गट तयार करून अ ,ब ,क ,ड याप्रमाणे उपवर्गीकरण करावे म्हणजे अल्पसंख्यांक जातींना सामाजिक क्षेत्रातील शैक्षणिक सेवाविषयक आणि राजकीय क्षेत्रात सर्व जातींना वाटा मिळेल व सर्व समाजाची प्रगती होईल.

अल्पसंख्यांक जातील नाही बहुसंख्यांक जातीप्रमाणेच सामाजिक क्षेत्रातील सर्व (सेवा शिक्षण राजकीय) फायदे मिळण्याचे दृष्टीने रोहिणी आयोग आपले शासनाने स्थापन केला परंतु त्यांनी घेतलेला निर्णय अद्याप लागू न केल्याने अल्पसंख्यांक जातीवर अन्याय होत आहे याबाबत शासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा व नाभिक समाज समाविष्ट अल्पसंख्यांक गटासाठी नऊ टक्के आरक्षण लागू करावे अशी नम्र विनंती करीत महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

**ज्ञानेश्वर गो डांगरकर**
**सरचिटणीस पश्चिम विदर्भ विभाग**
**महाराष्ट्र नाभिक महामंडळ**
**१३/ए अप्पर वर्धा सोसायटी**
**अर्जुन नगर मोर्शी रोड अमरावती**
**मो. नंबर 94 225 43 368**

# भंडारा जिल्हा सत्यसाई संघटनेच्या वतीने बसस्थानक येथे भव्य महाप्रसाद वितरण

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा :** श्री सत्य साईबाबा भगवान यांच्या 100 वर्षे जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त भंडारा जिल्हा सत्यसाई संघटनेच्या वतीने आठवडाभर वेगवेगळ्या ठिकाणी नवनवीन उपक्रम राबवले जात असून शनिवार दिनांक 22 नोव्हेंबरला भंडारा बस स्थानक येथे भव्य महाप्रसाद वितरण कार्यक्रम पार पडला.महाप्रसाद वितरण कार्यक्रमात मोठ्या प्रमाणामध्ये साईराम भक्तांनी सहभाग घेतला असून जवळपास 2000 पेक्षा जास्त भाविकांनी तसेच प्रवाशांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. सकाळी 09:30 वाजता श्री सत्यसाई बाबांच्या प्रतिमेचे पूजन करून महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. महाप्रसादात सर्वांना पोटभर खाण्याची मुभा होती तसेच गोड पदार्थ सुद्धा देण्यात आले.भंडारा जिल्हा संघटनेच्या वतीने दिनांक 16 नोव्हेंबर पासून दिनांक 23 नोव्हेंबर 2025 पर्यंत साई सप्ताहाचे



आयोजन करण्यात आले असून त्यात रोजच ओंकारम, सुप्रभातम, वृक्षारोपण, वैद्यकीय सेवा, गौसेवा, भजन सेवा, भजन साधना, महिला सुरक्षा मार्गदर्शन, मंदिर परिसर स्वच्छता, पशुवैद्यकीय सेवा, नारायण सेवा, पालखी सोहळा तसेच जन्मसोहळा, सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.सप्ताहाच्या आयोजनाकरिता भंडारा जिल्हाध्यक्ष धनराज माहुले, यशवंत टिचकुले, शामराव ठोंबरे, रवींद्र नागपुरे, प्रमोद पवार, रविशंकर साकोरे, सतीश करंजेकर, वासूजी चावरे, मधुकर गायधने, प्रकाश चाचरे, वैभव सूर्यवंशी, आशिष खेडेकर, श्रीवंत तितिरमारे, शुभम मानकर, भारती सार्वे, पौर्णिमा नागपुरे, संगीता गायधने, रश्मी करंजेकर, योगिता टिचकुले, प्राची देशपांडे, श्री. चवडेजी (वेल्डिंग शॉप) आणि सर्व सत्यसाई परिवार भंडारा जिल्हा यांनी खूप मेहनत घेतली.

**भंडारा जिल्हा सत्यसाई संघटनेच्या वतीने मानव जातीसाठी तसेच धरती मातेच्या संवर्धनासाठी अतिशय स्तुत्य उपक्रम वर्षभर मेहनत घेऊन राबविले जातात, साई सप्ताहाच्या निमित्ताने गोरगरिबांची सेवा, आरोग्य सेवा, गौसेवा, वृक्षारोपण, महिलांना मार्गदर्शन तसेच महाप्रसाद वाटप केले जाते, साई सप्ताहाच्या निमित्ताने सर्व भक्तांना धन्यवाद !**
**-डॉ.अक्षय कहालकर,**
**कहालकर दु:खनिवारक क्लिनीक भंडारा**




# वाशी हवेली ग्रामपंचायतीला कोकण विभागीय संत गाडगे महाराज समितीची गौरव भेट, गावाच्या यशकथेकडे राज्यभराचे लक्ष!

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी : शिरीष समेळ**

**म्हसळा** – म्हसळा आणि तळा तालुक्याच्या सीमारेषेवर वसलेले वाशी हवेली हे गाव गेल्या काही वर्षांत स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि डिजिटल प्रशासनातील उल्लेखनीय कार्यामुळे राज्यासह राष्ट्रीय पातळीवर विशेषत्वाने झळकले आहे. याच पार्श्वभूमीवर कोकण विभागीय संत गाडगे महाराज अभियान समितीच्या मान्यवर पथकाने आज वाशी हवेली ग्रामपंचायतीला भेट देत गावाच्या सर्वांगीण प्रगतीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. समितीने गावातील कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत ग्रामपंचायतीचे मन:पूर्वक कौतुक केले.

**वरिष्ठ अधिकारी व सामाजिक प्रतिनिधींची उपस्थिती**

या पाहणी भेटीत कोकण विभागातील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषद अलिबाग, पंचायत समिती तळा, तसेच विविध समाजबंधुत्वाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांमध्ये प्रमुख उपस्थिती—मा. प्रदीप घोरपडे, सहाय्यक आयुक्त, कोकण भवनश्री. गणेश गांधळे, लघुलेखक, कोकण भवन मा. महादेव शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती तळाश्री. जयवंत गायकवाड, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद अलिबागश्री. दत्ता नाईक, श्री. रविकिरण



गायकवाड श्रीमती पुष्पा नेरकर, प्रशासक तथा विस्तार अधिकारी श्री. धाऊ झोरे, विस्तार अधिकारी श्री. नंदकिशोर मुंडे, विस्तार अधिकारी कृषी श्रीमती अश्विनी धोत्रे, ग्रामपंचायत अधिकारी श्री. देविदास गायकवाडयावेळी गावातील विविध समाजांचे प्रतिनिधीही उपस्थित राहिले —

माजी सरपंच जगन्नाथ तांडेल, कोळी समाज अध्यक्ष ज्ञानदेव तांडेल, कुणबी समाज अध्यक्ष रमेश ताम्हणकर, बौद्ध समाज अध्यक्ष किशोर मोरे, कोळी समाज महिला मंडळ अध्यक्षा सौ. पदमू मेंदाडकर, कुणबी समाज महिला अध्यक्षा सौ. रमिला ताम्हणकर, बौद्ध समाज महिला अध्यक्षा श्रीमती सुनंदा मालू मोरे.

**पाच वर्षांत घडवलेली उल्लेखनीय विकासयात्रा**

ग्रामपंचायतीने मागील पाच वर्षांत स्वच्छ भारत अभियान, पाणीपुरवठा व्यवस्थापन, घनकचरा प्रक्रिया, हरित परिसर निर्मिती, डिजिटल सुविधा, महिला सक्षमीकरण आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागाच्या माध्यमातून गावाच्या विकासात ऐतिहासिक कामगिरी केली आहे.या सर्व उपक्रमांबद्दल वाशी हवेलीला अनेक राज्य व राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून, आज महाराष्ट्रातील अनेक गावे या मॉडेलचा अभ्यास करत आहेत.

**विकासाचे शिल्पकार — माजी सरपंच जगन्नाथ तांडेल**

ग्रामविकासाच्या या उज्वल प्रवासात माजी सरपंच जगन्नाथ तांडेल हे नाव विशेषत्वाने समोर येते. त्यांच्या नेतृत्वाखाली गावाने स्वच्छता स्पर्धांसह अनेक राज्य व राष्ट्रीय उपक्रमांत उल्लेखनीय यश संपादन केले.दिल्लीतील राष्ट्रीय पुरस्कार समारंभात स्वतः उपस्थित राहून त्यांनी गावाचा मान अभिमानाने वाढवला.

**समितीकडून प्रशंसा — “हे गाव महाराष्ट्रासाठी आदर्श मॉडेल”**

समितीच्या पथकाने गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था, डिजिटल प्रशासन, हरित उपक्रम, ग्रामनिधीचा पारदर्शक वापर आणि गावकऱ्यांचा एकदिलाने सहभाग पाहून समाधान व्यक्त केले.

“वाशी हवेली हे महाराष्ट्रातील आदर्श ग्रामविकासाचे मॉडेल असून इतर गावांनीही येथे केलेले काम आत्मसात करावे,” असे समितीतील मान्यवरांनी सांगितले.

**वाशी हवेली — छोटं गाव, मोठी कामगिरी!**

सततच्या प्रयत्नांनी आणि लोकसहभागाने वाशी हवेलीने कोकणातील विकासाचा नवा मापदंड निर्माण केला आहे. आज हे गाव राज्यातच नव्हे तर देशभर प्रेरणादायी उदाहरण म्हणून चर्चेत असून, “ गावानं ठरवलं तर बदल शक्य आहे” याची जिवंत प्रचिती वाशी हवेलीने निर्माण केली आहे.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# जेष्ठ नागरिकास महिना ७००० रु.मानधन महाराष्ट्र शासन देणार-डॉ.जयपाल पाटील

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर**

**अलिबाग :-** महाराष्ट्रातील जेष्ठ नागरिकांची संख्या वाढत असून त्याच्या साठी महाराष्ट्र शासनामार्फत विविध योजना बाबत दिनांक १५ जुलै २०२५ रोजी विधेयक मंजूरीचे राजपत्र प्रसिद्ध केले आहे.याबद्दल महाराष्ट्रातील जेष्ठ नागरिक संघटना,समाज सेवक पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी आणी महाराष्ट्र मुख्य मंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करीत आहेत. या योजना मिळविण्यासाठी वयाची ६५ वर्ष पुर्ण झाली असतील त्याचे भारत सरकारचे अथवा महाराष्ट्र शासनाचे जेष्ठ नागरिक ओळखपत्र शासनाच्या ईसेवा केंद्रात काढावे असे मार्गदर्शन अलिबाग जेष्ठ नागरिक संघटनेच्या मासिक बैठकीत जेष्ठ पत्रकार प्रा.डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले. यावेळेस अध्यक्ष श्री.प्रफुल्ल राऊत व उपाध्यक्षा सौ.चारुशिला कोरडे व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळेस प्रा.डॉ.जयपाल पाटील म्हणाले ज्या जेष्ठ नागरिकास कोणतीही पेन्शन मिळत नाही,त्याना आता दरमहा रु.७०००/-मिळणार असुन,महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे, मंदिरे पाहण्यास वर्षाला रु.१५०००/- अनुदान मिळणार असून, निराधार जेष्ठाना राहण्याची व जेवणाची सोय मोफत महाराष्ट्र शासन करणार आहे. केंद्र सरकारने ७० वर्षावरील जेष्ठांना रेल्वे



प्रवास ५० टक्के सवलत तर महाराष्ट्र राज्य परिवहन कडून एस.टी.प्रवास ५० टक्के सवलत त्याच बरोबर मालमत्ता करात ३० टक्के सवलत देण्यात येणार आहे.आरोग्य समस्या साठी सरकारी रुग्णालयात मोफत उपचार आहेतच, सोबत खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रिया साठी रु.५ लाख मिळणार आहेत. यासाठी प्रत्येक जेष्ठ नागरिकांनी केंद्र अथवा महाराष्ट्र शासनाचे ओळखपत्र काढणे आवश्यक आहे, या मध्ये सरकार कडून ३ विभागात कार्डाची आखणी केली असुन वय वर्ष ८० च्या वर सुपर कार्ड,वय ७० च्या वर मध्यम कार्ड आणी ६५ वर्षावरील सर्व योजना प्राप्त होणार असे डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले.व कोणतीही आपत्ती आल्यावर रायगडचा युवक फाउंडेशनला संपर्क साधून सेवा करण्याची संधी द्यावी असे सांगितले.यावेळेस संघटनेचे सचिव श्री.नंदु तळकर ,सहसचिव श्रीमती मेघना कुलकर्णी,खजिनदार प्रणिता वर्तक, श्री.आर.के.घरत,कार्यकारिणी सदस्य व ईतर सभासद उपस्थित होते.

# हिमायतनगर नगरपंचायत विकासाच्या मुद्द्यावर व सर्व जाती-धर्मांच्या जनतेला विश्वासात घेवुन निवडणूक लढविणार :-डॉक्टर राजेंद्र वानखेडे

## देशात नरेंद्र,महाराष्ट्र देवेंद्र व हिमायतनगरात राजेंद्र चा बोलबाला...

**दैनिक युवक आधार**
**ता.प्रतिनिधी माधव काईतवाड बोरगडीकर**

**हिमायतनगर-** आगामी होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचार शुभारंभ आज दिनांक 22 नोव्हेंबर रोजी श्री परमेश्वर मंदिर येथून करण्यात आला या प्रचार शुभारंभाच्या कार्यक्रम प्रसंगी भाजपा नेते डॉ.अंकुश देवसरकर,गिरीश जाधव, डॉ. प्रसाद डोंगरगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री परमेश्वर महाराजांची महापूजा व आरती करून अनेक मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून या नगरपंचायत निवडणुकीचा प्रचार शुभारंभ करण्यात आला प्रचार शुभारंभाच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या भाजपाच्या पदयात्रेला




मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला रॅलीच्या मार्गावर विविध मंदिरासह अनेक ठिकाणी श्रीफळ फोडण्यात आले जागोजागी भाजपा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असलेले डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांचे मतदारांनी स्वागत करून त्यांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला त्यामुळे शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे

या बाबत सविस्तर वृत्त असे कि हिमायतनगर नगर पंचायत निवडणूक कार्यक्रमाचा आज दि 22 नोव्हेंबर रोजी भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदा सह सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी बोलताना डॉ. वानखेडे यांनी असे सांगितले की आगामी होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढविणार आहे मला एन वेळी उमेदवारी मिळाल्यामुळे सर्वच्या सर्व जागी उमेदवार उभे करता आले नाही याची खंत आहे पण सोबत असलेल्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन जनसेवे सोबत आरोग्य सेवेत सुद्धा काम करत मी हिमायतनगर शहरात विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढविणार आहे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा भाजपा नेते खासदार अशोकरावजी चव्हाण साहेब हे या निवडणुकीत विशेष लक्ष देऊन हिमायतनगर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ते रोल मॉडेल ठरणार आहेत व हिमायतनगरच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट भारतीय जनता पार्टीकडे तयार आहे अनेक विकासाच्या मुद्द्यावर येथील नगरपंचायत निवडणूक लढविली जाणार आहे कुठल्याही जातीपातीचा मतभेद न करता ही निवडणूक लढवून आम्ही जिंकणार आहोत आम्हाला कुठल्याही विरोधकांचे आव्हान नाही असे सांगत डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांनी विकास कामाच्या आधारावर भारतीय जनता पार्टीचा विजय निश्चित असल्याचे सांगितले

यावेळी उपस्थित डॉक्टर अंकुश देवकर गिरीश जाधव डॉक्टर प्रसाद डोंगरगावकर भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष गजानन चायल,शहराध्यक्ष विपुल दंडेवाड, शरद चायल, नागेश डूडूळे, परमेश्वर सातव, अनिल शामराव माने, पंकज मुधोळकर, आशिष सकवान, भारत डाके, रामेश्वर सूर्यवंशी, दुर्गेश मांडोजवार,सह असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# गीता जयंतीनिमित्त निफाड तालुक्यातील विष्णूनगरात अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विष्णूनगर (ता. निफाड)** – श्री गीता जयंती तसेच श्री ज्ञानेश्वर माऊली सामुदायिक पारायण महोत्सवानिमित्त विष्णूनगर (पाबळवाडी) येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे ७३वे वर्ष मोठ्या भक्तिभावाने सुरू झाले आहे. २५ नोव्हेंबर २०२५ ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत दररोज नामस्मरण, प्रवचन, कीर्तन आणि विविध आध्यात्मिक कार्यक्रमांनी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

गेल्या ७३ वर्षांपासून चालत आलेल्या या पारंपरिक हरिनाम सप्ताहाला यंदाही भव्य स्वरूप देण्यात आले आहे. आकर्षक सजावट, भगवे पताका आणि प्रकाशयोजनांनी गावाचे वातावरण अधिकच पवित्र झाले आहे. ग्रामस्थ, महिला मंडळे व युवकांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष उल्लेखनीय आहे.

**मान्यवर कीर्तनकारांची कीर्तनमाला**

राज्यातील प्रसिद्ध कीर्तनकार संतवाङ्मय, गीता, ज्ञानेश्वरी आणि हरिनाम महात्म्य यांचा संगम साधत रसाळ प्रवचन व कीर्तनसेवा सादर करत आहेत.

२५ नोव्हेंबर – ह.भ.प. मधुसूदन महाराज मोगल




२६ नोव्हेंबर – ह.भ.प. पुंडलिक महाराज जाधव

२७ नोव्हेंबर – ह.भ.प. उमेश महाराज दशरथे

२८ नोव्हेंबर – ह.भ.प. सुनील महाराज झांबरे

२९ नोव्हेंबर – ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली काकडे

३० नोव्हेंबर – ह.भ.प. जगदिश महाराज जोशी

१ डिसेंबर – ह.भ.प. एकनाथ महाराज सदगीर

समारोपाच्या दिवशी सकाळी ११ ते १ – ह.भ.प. एकनाथ महाराज सदगीर यांचे विशेष नामसंकीर्तन.

**दररोजचे भक्ती कार्यक्रम**

पहाटे ४ ते ६ – काकडा भजन

सकाळी ७ ते ११ – ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण

सकाळी ११ ते १२ – गाथा भजन

सायंकाळी ४ ते ५ – प्रवचन

सायंकाळी ५ ते ६ – हरिपाठ

सायंकाळी ७ ते ९ – हरिकीर्तन

या सातत्यपूर्ण उपक्रमांमुळे संपूर्ण विष्णूनगर भक्तिभावाच्या सुवासाने भरून जात आहे. भक्तिभावाचा दरवळ*पारायण, भजन, हरिपाठ, आरती आणि महिला मंडळांच्या भजनसेवेने सप्ताहाचे वातावरण अधिकच अध्यात्ममय झाले आहे. भाविकांसाठी आसनव्यवस्था, शुद्ध पिण्याचे पाणी, प्रकाशयोजना आणि शिस्तबद्ध व्यवस्थापनाची उत्तम सोय करण्यात आली आहे.

आयोजक मंडळाने सर्व भाविकांना परिवारासह उपस्थित राहून हरिनाम सप्ताहाचा आध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# ओबीसी प्रवर्गाचे अ, ब ,क ,ड उपवर्गीकरण करून यातील अल्पसंख्यांक जातींनाही समान आरक्षण देऊन सामाजिक न्याय देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत माननीय मुख्यमंत्री माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :**

ओबीसी प्रवर्गाचे अ ,ब ,क ,ड उपवर्गीकरण करून यातील अल्पसंख्यांक जातींनाही समान आरक्षण देऊन सामाजिक न्याय देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस साहेबांना महाराष्ट्र नाभिक महामंडळ यांच्या वतीने निवेदन देण्यात आलेआपणा सर्वांना विदित आहे की ओबीसी प्रवर्गामध्ये एकूण 345 पेक्षा अधिक जातींचा समावेश आहे. आणि या प्रवर्गासाठी रोहिणी मंडळ आयोगानुसार सामाजिक, शैक्षणिक ,सेवाविषयक आणि राजकीय क्षेत्रात 27% आरक्षण लागू आहे. भारत देश स्वतंत्र झाल्यापासून/महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यापासून या प्रवर्गातील सामाजिक शैक्षणिक सेवाविषयक आणि राजकीय क्षेत्रातील 80 टक्के फायदे केवळ बहुसंख्येने क्रमांक एक वर असलेल्या एका जातीने आणि 20 टक्के फायदे बहुसंख्येने क्रमांक दोन आणि तीन वर असलेल्या दोन जातीने घेतलेले आहेत. या प्रवर्गातील जवळपास 345 जातींपैकी तीन बहुसंख्यांक जाती वगळता उर्वरित 342 अल्पसंख्यांक जाती राजकीय, शैक्षणिक, सेवाविषयक आधी सामाजिक क्षेत्रातील सर्वच फायद्यांपासून आजही वंचित आहेत. या अन्यायावर आज पर्यंत कोणत्याच शासनाने उपाययोजना केलेली नाही म्हणून या 342 अल्पसंख्यांक जातीवर आज पर्यंत अन्याय झालेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये उपवर्गीकरण मान्य केलेले आहे. यामुळे या अनुसूचीतील अल्पसंख्यांक जातींना न्याय मिळाला आहे अशाच प्रकारे अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये सुद्धा अ ब क ड उपवर्गीकरण आधीच असल्याने या प्रवर्गातील अल्पसंख्यांक जातींना सर्वच सामाजिक क्षेत्रात वाटा मिळाला व सर्व जातीची प्रगती होत आहे.

वरील प्रकारे ओबीसी प्रवर्गामध्ये सुद्धा बहुसंख्यांक अल्पसंख्यांक व अति अल्पसंख्यांक आणि इतर असे गट तयार करून अ ब क ड याप्रमाणे उपवर्गीकरण करावे म्हणजे अल्पसंख्यांक जातींना सामाजिक क्षेत्रातील शैक्षणिक सेवाविषयक आणि राजकीय क्षेत्रात सर्व जातींना वाटा मिळेल व सर्व समाजाची प्रगती होईल. अल्पसंख्यांक जातींनाही बहुसंख्यांक जातीप्रमाणेच सामाजिक क्षेत्रातील सर्व सेवा, शिक्षण, राजकीय फायदे मिळण्याचे दृष्टीने रोहिणी आयोग आपले शासनाने स्थापन केला परंतु त्यांनी दिलेला निर्णय अद्याप लागू न केल्याने अल्पसंख्यांक जातीवर अन्याय होत



आहे याबाबत ताबडतोब निर्णय घ्यावा व नाभिक समाज समाविष्ट अल्पसंख्यांक गटासाठी नऊ टक्के आरक्षण लागू करावे अशी नम्र विनंती महाराष्ट्र नाभिक महामंडळ च्या वतीने या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदरचे निवेदन देण्याचे वेळी सौ अनुष्का बेलोरकर मॅडम, श्री ज्ञानेश्वर डांगरकर सर, श्री ओंकार राव राऊत सर, श्री विनोद डोंगरे सर, श्री रमेश घवले सर, श्री शरदचंद्र पुसतकर सर, सौ ज्योत्सना करवाडे मॅडम, श्री बोबडे सर, श्री निंभोरकर सर, श्री अमृतकर सर, श्री सौरभ डांगरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

**श्री ज्ञानेश्वर गो डांगरकर, सरचिटणीस पश्चिम विदर्भ विभाग ,महाराष्ट्र नाभिक महामंडळ ,3/ए अप्पर वर्धा कॉलनी अर्जुन नगर मोर्शी रोड अमरावती,मो.नं. ९४२२५४३३६८**

# जय भवानी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र ग्रामीण बँकेस अभ्यास भेट

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी)** : पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालयातील हिंदी विभाग आयोजित अध्ययन उपक्रमांतर्गत महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा पाटोदाला विद्यार्थ्यांची अभ्यास भेट करून, तेथील बँकेच्या दैनदिन कामकाजाची माहीती घेण्यात आली. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना बँकींग क्षेत्रातील रोजगाराच्या संधी ज्ञात व्हाव्यात व बँकींग क्षेत्रातील कामकाज कळावे. रोजगार व भविष्यातील व्यवहारीक ज्ञान प्राप्त होऊन त्यांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा या साठी महाविद्यालयाचे उपक्रमशील प्राचार्य डॉ.विश्वास कदम व प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली




हिंदी विभाग प्रमुख प्रो.डॉ.वंदन जाधव यांनी या अभ्यास भेटीचे आयोजन केले होते. या अभ्यास भेटीत विद्यार्थ्यांना शाखा व्यवस्थापक श्री.शिंदे एस.बी.यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधत उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या संधी विविध अव्हाने व बदलत्या काळानुसार स्वतः आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता विशद केली. व बँकींग व्यवहारात विविध ठेवी व विविध कर्ज प्रकाराची सविस्तर माहिती दिली. या वेळी बँकेचे अधिकारी श्रीमती पडवळ के. एस., श्रीमती चैताली कुसळकर मॅडम व श्री.लक्ष्मण अंदुरे यांनी ही बँकींग कामकाजा विषयी विशेष माहीती देऊन. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. या माहीतीमुळे विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. ही बँकींग अभ्यास भेट यशस्वी करण्यासाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ.सुनील जाधव, प्रा.सोमनाथ घाडगे, प्रा. डॉ.बंडू लोखंडे, ग्रंथपाल श्रीमती रकटे जे बी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या अभ्यास भेटीत बहुसंख्य हिदी विषयाच्या विद्यार्थी विद्यार्थीनीनी सहभाग नोंदवला.

एका आगळ्या वेगळा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# सत्यमेव जयते फार्मर कपअंतर्गत शेतकरी प्रशिक्षण संपन्न

## निफाडमध्ये कृषी विभाग व पाणी फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २० नोव्हेंबर २०२५ रोजी कृषी उत्पन्न उपबाजार समिती, निफाड येथील सभागृहात सत्यमेव जयते फार्मर कप उपक्रमांतर्गत शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमास उपविभागीय कृषी अधिकारी बी. जी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच तालुका कृषी अधिकारी एस. एस. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. पाणी






फाउंडेशनतर्फे संघटनेचे फाटक व गणेश खामकर यांनी शेतकरी गट संघटना, शेतकरी उत्पादक कंपनीचे महत्त्व, त्यांची कार्यपद्धती तसेच पाणी फाउंडेशनची वाटचाल व शेती शाळेचे महत्त्व या मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच मंडळ कृषी अधिकारी मनोज रोंगटे (पिंपळगाव बसवंत) यांनी महाविस्तार ए-आय ॲप उपस्थित शेतकऱ्यांमार्फत डाऊनलोड करून त्याचा प्रभावी वापर प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितला.यावेळी निफाड पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने शेतकरी बंधू-भगिनी उपस्थित होते. तसेच मंडळ कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी व बीटीएम यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# सामाजिक कार्यकर्ते रफिक कुरेशी यांच्या मातोश्री सलीमाबी बानो सत्तार कुरेशी प्रभाग क्रमांक 4 मधून उतरल्या निवडणूक रिंगणात

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)** : परतूर येथील सामाजिक कार्यकर्ते रफिक कुरेशी यांच्या मातोश्री सलीमाबी बानो सत्तार कुरेशी या परतूर नगरपालीकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक 4 मधून भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत.जनतेने जर निवडून देऊन नगरपालिकेत जाण्याची संधी दिली तर प्रभाग क्रमांक 4 चा चेहरा मोहरा बदलून टाकेल असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.रफिक कुरेशी यांनी आपल्या मातोश्रीला निवडून



आणण्यासाठी प्रभागात मोर्चे बांधणी करण्यास सुरुवात केली आहे. सर्वसामान्यांचे कामे करत आपली राजकीय प्रतिष्ठा निर्माण करणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. या वेळी मी स्वतः प्रभागात लक्ष घालणार असून नागरिकांच्या नागरिक सुविधेचे सर्व प्रश्न सोडवणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.माझीआई जर निवडून आली तर प्रभाग क्रमांक 4 पारधी वाडा येथील दुर्गामाता सभामंडप, महादेव मंदिर येथील सभा मंडप शहा पीर बदला दर्गा येथे रस्ता करणार असल्याचे त्यांनी सांगितले.प्रभागाची अवस्था पाहता आपल्या प्रभागाला खंरच यावेळी एका प्रभावी नेतृत्वाची गरज असल्याचे ते म्हणाले. प्रभागाची अवस्था पाहता सर्वत्र घाणीचे साम्राज्य आहे, नागरिकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेईन व नागरीकांच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

आमच्या परिवारातुन माझ्या आईला भारतीय जनता पक्षाकडून निवडणुक लढवण्याची संधी मिळाली व जनता जनार्धनाच्या आशिर्वादाने सभागृहात पाठवले तर अनेकांची कामे करेल असे त्यांनी सांगितले.प्रभागातीत मतदारांनी माझ्या आईला निवडून दिले तर संधीचे सोने करूण दाखवेल अशी ग्वाही त्यांनी आमच्या प्रतिधीसी बोलताना यावेळी दिली.

# उरण द्रोणागिरी नोड मध्ये आढळलेल्या ८ फूट लांबीच्या अजगरास सर्पमित्रांनी दिले जीवनदान

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

द्रोणागिरी नोड नवी मुंबईतील रायगड जिल्ह्यातील एक विकसित होणारे सिडको नोड आहे आणि आता द्रोणागिरी हे एक मोठे व्यावसायिक केंद्र म्हणून विकसित झाले आहे त्याचप्रमाणे मोठमोठे रहिवासी संकुल उभारले गेले आहेत. काही ठिकाणी इमारतीचे बांधकाम मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. द्रोणागिरी नोड आजुबाजुला खाडी आणि खारफुटी कांदळवन चे जंगल दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या वस्ती तसेच विस्तारीकरणाच्या दृष्टीने द्रोणागिरी आता नवीमुंबई शहराप्रमाणे गजबजू लागले आहे. मानव निर्मीत शहरांमुळे पशु ,पक्षी आणि जंगली प्राणी यांना आपल्या भक्ष्याच्या शोधासाठी रस्त्यावर मानवाच्या रहदारी च्या ठिकाणी येण्याची वेळ आली आहे .याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आपणांस रोज ऐकावयास मिळणारी बिबट्यांची दहशत ,त्याचप्रमाणे आता सरपटणारे प्राणी ही मानवी वस्तीत आपले भक्ष्य शोधण्यासाठी येत आहेत.शुक्रवार दिनांक २१ रोजी द्रोणागिरी नोड से.५२ मध्ये रात्री आठच्या सुमारास मुख्य रस्त्यावरील दुभाजकातील गवतात येथील रहिवाशीयांना अजगर दिसल्याने नागरिकांची घाबरगुंडी उडाली व त्यांनी सर्पमित्र नितीन घरत यांना फोन करताच त्यांच्या सोबत बेलपाडा येथील सर्पमित्र साजन या दोन सर्पमित्रांनी या अजगरास पकडून त्यास जासयी समोरील डोंगरात सोडून दिले. सुमारे ८ फुट लांबीचा हा अजगर होता.

द्रोणागिरी येथील मुख्य रस्त्यावरील दुभाजकात अजगर



दिसल्याने त्याला पाहण्यासाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. त्यानंतर नागरिकांनी सर्पमित्र साजन व नितीन घरत यांचे आभार मानले.

## थोडक्यात

## बांधकाम व्यवसायात यशस्वी चेहरा इंजि. बाळासाहेब बोडखे



**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे :** आष्टी तालुक्यातील आदर्श गाव आनंदवाडी सराटेवडगाव या छोट्याशा गावात जन्मलेले इंजिनिअर बाळासाहेब सुखदेव बोडखे यांनी अभियंता म्हणून पदवी प्राप्त केल्यानंतर कडा शहरांमध्ये २०१८ साली बोडखे इंजिनिअर अँड डेव्हलपर्स हे ऑफिस सुरू केले. सात वर्ष जिद्द, चिकाटी, मेहनत करून रेसिडेन्सीयल इमारती उभ्या करून वैयक्तिक बांधकाम करून निवासस्थान विक्री केली आहेत.आजपर्यंत ६०० टुमदार बंगले कडा व शहर व परिसरात त्यांनी बांधले आहेत. इंजिनिअर बाळासाहेब सुखदेव बोडखे, इंजिनिअर योगेश नवनाथ बोडखे यांच्या नियंत्रणाखाली जागा घेऊन मटेरियलसह बांधकाम करून बंगले विक्री केले आहेत. बांधकाम व्यावसायिक म्हणून त्यांनी आपला तालुक्यातच नव्हे तर बीड जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त केला आहे. प्लॅनिंग, कन्स्ट्रक्शन, डिझायनिंग, इस्टिमेट, आर्किटेक्चर्स, टू डी, थ्री डी एलेवेशन, (सजावट) प्लॉटिंग आरसीसी कन्सल्टट आदी कामे इंजिनिअर बोडखे हे करीत आहेत. सात वर्षाच्या या यशस्वी कारकिर्दी नंतर त्यांचे अभिनंदन केले जात आहे. आदर्श गाव सराटेवडगाव - आनंदवाडी ग्रामपंचायतचे सरपंच भीमराव बोडखे यांचे ते बंधू आहेत.

## एक्सयुव्ही गाडीची कंटेनरला पाठीमागून धडक ; 2 ठार 5 जखमी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल जवळील भंगारपाडा, पंकज पार्कींग समोरील जेएनपीटी-पनवेल येथील रोडवर एका एक्सयुव्ही गाडीने कंटेनरला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात 2 ठार तर 5 जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.हर्ष संतोष पाटील (21 रा.नेरुळ) हा त्याच्या ताब्यातील काळ्या रंगाची एक्सयुव्ही 700 क्र.एमएच-43-सीएम-8847 ही कार घेवून हयगयीने व निष्काळजीपणे चालवून समोरुन जात असलेल्या एका कंटेनरला पाठीमागून धडक मारुन झालेल्या अपघातात हितेंद्र पाटील (22), श्रीनाथ चंद्रशेखर (22) हे दोघे गंभीररित्या जखमी होवून मयत झाले आहेत. तर चालक हर्ष पाटील याच्यासह इतर 5 जण जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कळंबोलीतून साडेपाच किलो गांजा केला जप्त

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कळंबोली रोड पाली लिंक रोडवरील एका ढाब्याजवळ, काही जण गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अंमलदार ओमकार भालेराव यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने छापा मारून गांजा, मोबाईल व चार चाकी असा एकूण जवळपास 10 लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तर यामध्ये 4 आरोपींना अटक केली आहे.नशामुक्त नवी मुंबई या अभियाना अंतर्गत अमली पदार्थ विरोधी कारवाईच्या सूचना, आयुक्त मिलिंद भारंबे यांनी सर्वच विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार काम करत असताना मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अंमलदार ओमकार भालेराव यांना विश्वसनीय सूत्रांकडून माहिती मिळाली की, काही इसम हे कळंबोली परिसरात, रोडपाली लिंक रोड वरील डी डी धाब्याजवळ, गांजा विक्रीसाठी येणार आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारावर सहाय्यक आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या आदेशानुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक निरीक्षक महेश जाधव, सहाय्यक उपनिरीक्षक मंगेश वाट, पोलिस अमलदार नितीन जगताप, दिलीप ठाकूर व ओंकार भालेराव यांनी त्या ठिकाणी सापळा लावून धाड टाकली व चारही इसमांना ताब्यात घेतले. एकूण 9 लाख 90 हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

## गांजा जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** गांजा जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका इसमाविरोधात कारवाई केली आहे.अमित गौतम (28) असे या इसमाचे नाव असून त्याच्याकडे गांजा या अंमली पदार्थाची हिरवट मळकट रंगाची पाने-फुले असलेला पाला तो एका चिलीममध्ये भरुन झुरके मारत असताना पनवेल शहर पोलिसांचे पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे व पो.ना.विनोद देशमुख यांना आढळून आल्याने त्यांनी त्याला ताब्यात घेवून त्याच्या विरोधात 687/2025 गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम 1985 चे कलम 8 (क), 27 अन्वये कारवाई केली असून पुढील तपास पो.हवा.योगेश दिवेकर करीत आहेत.

# यज्ञावर झालेल्या अत्याचाराने विष्णुनगर संतप्त

## यज्ञा - बालिकेला न्याय मिळाल्याशिवाय शांतता नाही

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

**विंचूर – विष्णुनगर :** मालेगाव तालुक्यातील डोंगराळे परिसरात चार वर्षीय चिमुकली यज्ञावर झालेल्या अमानुष अत्याचार आणि हत्येने संपूर्ण जिल्हा संतापाने पेटून उठला आहे. याच निषेधार्थ विष्णुनगरमध्ये आज नागरिकांनी एकत्र येत निषेध मोर्चा काढला.

वातावरणात वेदना, संताप आणि न्यायाची तीव्र मागणी घुमत होती.

मोर्च्यात ग्रामस्थांसोबत विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी यज्ञाला श्रद्धांजली अर्पण केली आणि आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची ठाम मागणी केली.मोर्च्यातील सर्वात भावनिक क्षण विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा होता. लहान मुलांनी हातात "यज्ञा बालिकेला न्याय मिळालाच पाहिजे", "मुलींना वाचवा", "समाज जागा करा" अशा घोषणा असलेले फलक धरून शांततेत रॅली काढली. त्यांची रडवेली चेहरे आणि तीव्र वेदना गावकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आणणारी होती.



गावातील प्रमुख मार्गांनी मोर्चा फिरल्यानंतर यज्ञाच्या स्मरणार्थ काही क्षण मौन पाळण्यात आले. त्या क्षणी गावभर अवर्णनीय शोक दाटून आला. रॅलीदरम्यान शिक्षकांनी मुलांना सुरक्षिततेबाबतच्या मूलभूत सूचना दिल्या, तर पालकांनी मुलांच्या वाढत्या असुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली. महिलांनी गावात विशेष जागरूकता मोहीम राबवण्याचा निर्धार व्यक्त केला. मुख्याध्यापक मापारी सर, पोलीस पाटील रामकृष्ण सुराशे, तसेच अमोल दरेकर यांनी




पालकांना मुलांवर लक्ष ठेवण्याचे, मोबाईलपासून दूर ठेवण्याचे आणि घरात कधीही मुलांना एकटे न ठेवण्याचे आवाहन केले."अशा क्रूरतेला माफी नाही; आरोपीला फाशीच द्यावी," असा एकमुखी सुर मोर्चातून उमटला.

या मोर्च्यात तंटामुक्ती समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर देसले, आनंदा देसले, भास्कर भडांगे, रघुनाथ जेऊघाले, हेमंत घायाळ, विलास जेऊघाले, राजेश भडांगे, ज्ञानेश्वर घायाळ,अमोल घायाळ, राजू जेऊघाले, दिलीप संधान यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिला सहभागी झाले.सर्वांनी घोषणा दिली — "यज्ञासाठी न्याय मिळेपर्यंत आमचा लढा थांबणार नाही!"मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामूहिक शपथग्रहणाने झाला.

"मुलांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी आपण सर्व जण एकजूट राहू; आणि अशा घटना पुन्हा होऊ देणार नाही" — अशी एकमुखी शपथ घेतली.

## श्रीवर्धन आराठी परिसरातील नागरिक त्रस्त
## कोहिनूर बिल्डिंगजवळ नाल्यातील घाणेरडे पाणी रस्त्यावर

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धनच्या आराठी भागात शबीना पेट्रोल पंपाजवळ असलेल्या कोहिनूर बिल्डिंगसमोरची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. इथल्या नाल्यातील पाणी सतत रस्त्यावर येत असून, त्या घाण पाण्यामुळे परिसरात दिवसभर असह्य दुर्गंधी पसरलेली असते. रस्त्यावरून जाणारे वाहनचालक आणि आसपास राहणारे नागरिक यांना नाहक यातना सहन कराव्या लागत आहेत.या समस्येबाबत अनेक वेळा ग्रामपंचायतीकडे तक्रारी करण्यात आल्या, पण त्या तक्रारींना आजवर काहीही प्रतिसाद मिळालेला नाही. इतक्या वेळा सूचना करूनही कोणतीही कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. ही समस्या जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली जात आहे का, असा प्रश्न परिसरातील लोकांमध्ये जोरात चर्चिला जात आहे.रस्त्यावर वाहणारे हे नाल्याचे पाणी केवळ अस्वच्छतेचे प्रतीक नाही, तर आजारांना आमंत्रण



देणारी धोकादायक परिस्थिती निर्माण करत आहे. लहान मुले, वृद्ध आणि महिलांना विशेष त्रास सहन करावा लागत असून, व्यापारी आणि दुकानदारही या दुर्गंधीमुळे हैराण झाले आहेत.नागरिकांची एकच मागणी—ग्रामपंचायतीने तातडीने या समस्येकडे लक्ष द्यावे, नालीची स्वच्छता व दुरुस्ती करावी आणि परिसर पुन्हा स्वच्छ, सुरक्षित करावा. नाहीतर आता लोकांचा संयम सुटत चालला असून, प्रशासनाविरोधात कठोर भूमिका घेण्याची शक्यता बोलली जात आहे.

## कामरगाव येथे 'सेल्फी विथ संविधान' उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**कामरगाव :** अनुभव शिक्षा केंद्र अमरावती–वाशिम यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'सेल्फी विथ संविधान' या उपक्रमाचा शुभारंभ दि.२१/११/२०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, कामरगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन धनज पोलिस ठाण्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक भरत लसंते साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी प्रमुख उपस्थित म्हणून जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुरेश राठोड, अनुभव शिक्षा केंद्राचे साथी रोशन चव्हाण, तसेच उपक्रमाचे आयोजक आशिष धोंगडे उपस्थित होते.'सेल्फी विथ संविधान' उपक्रमाचा उद्देश संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूलभूत मुल्यांचा प्रसार करणे हा आहे. युवक, विद्यार्थी व नागरिकांमध्ये संविधानिक मूल्यांची जाण




आणि लोकशाहीबद्दलची प्रतिबद्धता वाढावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.कार्यक्रमानंतर उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी संविधानाची प्रस्तावना वाचून सेल्फी काढत उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला. आगामी आठवडाभर हा उपक्रम विविध शाळांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी राबविण्यात येणार असून संविधानिक जागरूकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हेच या मोहिमेचे प्रमुख ध्येय आहे.

## कॉम्रेड नितिन गावित यांना राज्य DYFI सदस्यपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा** : आमदा (प.) येथील दमदार युवा सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड नितिन गावित यांची महाराष्ट्र राज्य DYFI ( डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया ) संघटनेच्या राज्य सदस्यपदी निवड झाली असून सुरगाणा तालुक्यात मोठ्या आनंदाचे वातावरण आहे.सुरगाणा तालुका अध्यक्ष म्हणून कार्य करताना त्यांनी विविध आंदोलने, संघर्ष आणि जनआंदोलनांच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या समस्यांना प्रभावीपणे वाचा फोडली.कॉम्रेड गावित यांच्या संघर्षशील नेतृत्वाची दखल घेऊन ही महत्वपूर्ण नियुक्ती देण्यात आली आहे. ही निवड आदिवासी युवकांच्या आवाजाला नवे बळ देणारी ठरणार आहे.कॉ. नितीन




गावित यांनी तळागाळात गोर गरीब जनतेच्या समस्या ओळखून जनहिताची काम करत सामान्य माणूस हीच ओळख जपली.

आज पर्यंत कुठलाही निर्णय घेतला असेल तो सर्व सामान्य माणसाची समस्या समजून निराकरण करत तालुक्यात कमवलेले नाव हीच कामाची पोचपावती मिळाली आहे त्यांचे राज्य सदस्य निवडीबद्दल अभिनंदन व पुढील कामासाठी मन:पुर्वक शुभेच्छा आहेत

## पनवेल प्रशासकीय भवनातील समस्या दुर्लक्षित; प्रांताधिकाऱ्यांच्या बैठकीतील निर्णयाला केराची टोपली

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** प्रशासकीय भवनातील तातडीच्या समस्या सोडवण्यासाठी महिनाभरापूर्वी पनवेलचे प्रांताधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या मुख्य उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीत स्वच्छता सोडता कोणत्याही इतर मुद्द्यावर ठोस पावले उचलली गेली नाहीत. बैठकीत भवनातील पोलीस विभागाने खोल्या हस्तांतरण, स्वतंत्र वीज मीटर, थकीत वीज देयक जमा करणे, उद्वाहक आणि इमारतीच्या देखभालीसंदर्भात निर्णय घेण्यात आले होते. परंतु त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे पुरते दुर्लक्ष करण्यात आले आहे. यामुळे प्रशासकीय भवनातील समस्या सोडवण्यासाठी प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात आली आहे.शिवसेन पक्षाचे (एकनाथ शिंदे गट) पनवेल ज्येष्ठ शिवसैनिक चंद्रशेखर सोमण यांनी 3 ऑक्टोबरला दिलेल्या निवेदनानंतर पनवेलचे उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी 17 ऑक्टोबरला बैठक बोलावली होती. या बैठकीत अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील, पनवेल. पोलीस निरीक्षक ए. एच. अभंग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता निखिल गाडे, उपकोषागार अधिकारी धोत्रे, वीज महावितरण कंपनीचे अभियंता धनंजय सातपुते, नायब तहसीलदार संभाजी शेलार, शिवसेनेचे गणेश वाघिलकर, महेश सावंत, प्रसाद सोनावणे हे उपस्थित होते.प्रशासकीय भवनातील स्वच्छतेसाठी महसूल विभागाच्या मोठ्या इमारतींप्रमाणे प्रत्येक कार्यालयाने त्यांच्या कार्यालयासमोरील स्वच्छता करण्याचा संयुक्तिक निर्णय घेण्यात आला. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि बेसमेंटमधील अस्वच्छता दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना दिल्या. तसेच एकाच वीज मीटरमुळे येणारा मोठा भार कमी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी चांडक यांनी भूसंपादन विभागातील निधीतून स्वतंत्र वीज मीटर बसविण्यासाठी ठेव रक्कम भरण्यात येईल असेही ठरले. सार्वजनिक बांधकाम विभागाने महिन्याभरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि स्वच्छतागृहाची देखभाल करू असे सांगितले होते. मात्र महिना उलटला तरी देखभालीची कामे सुरू झाली नाहीत.अपंग व ज्येष्ठ नागरिकांना अप्पर तहसीलदारांची भेट घेण्यासाठी या भवनातील जिने वापरावे लागणार आहेत. बैठकीनंतर महिना उजाडला तरी उद्वाहक अद्याप सुरू होऊ शकले नाही. याहून बिकट स्थिती या भवनाच्या विजेची आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकाचे एक हजारांचे वीज देयक थकल्यावर तेथील वीज जोडणी तातडीने तोडली जाते. मात्र 8 लाखांचे वीज देयक थकीत राहणे हे सरकारच्या प्रशासकीय भवनासाठी लाजिरवाणी बाब आहे. बैठकीत ठरल्याप्रमाणे नवीन मीटरसाठी महावितरणकडून थकीत रक्कम भरण्याची अट असल्याने स्वतंत्र वीज मीटरचा प्रश्न अद्याप कायम आहे.पनवेल शहर पोलिसांची या प्रशासकीय भवनात हक्काची जागा आहे. भवनातील तळमजल्यावरील 22 खोल्या या पोलीस विभागाच्या आहेत. मात्र अजूनही या खोल्या हस्तांतरण करून तेथे पोलीस ठाण्याचा कारभार सुरू केला नाही.

## राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** माणुसकीचे नाते जपणारे, सर्व समाजघटकांना आपलेसे करणारे आणि सतत जनसामान्यांच्या समस्यांसाठी कटिबद्ध राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असणारे भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस शनिवारी (२२ नोव्हेंबर) मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीची जपणूक करत साजरा करण्यात आला.



या निमित्ताने विविध मान्यवरांनी उपस्थित राहून अरुणशेठ भगत यांचे अभिष्टचिंतन केले. यात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितिन पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मंडल अध्यक्ष, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक तसेच विविध संस्था-संघटनांचे पदाधिकाऱ्यांनी अरुणशेठ भगत यांचे अभिष्टचिंतन केले. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

अरुणशेठ भगत यांनी वर्षानुवर्षे सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा गौरवही यावेळी उपस्थित मान्यवरांनी केला.

## पनवेल वाहतूक शाखेने हरविलेली बॅग दिली मिळवून

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** एका महिलेची हरविलेली बॅग पनवेल वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे परत मिळाल्याने त्यांनी आनंद व्यक्त करून आभार मानले आहेत.वसुधा ओमकार जगे यांची बॅग खांदा कॉलनी येथे हरवले असता सदर महिला पनवेल वाहतूक शाखा कार्यालय येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना भेटून सदर बाबत



समक्ष सांगितले. औदुंबर पाटील यांनी तात्काळ त्यांचे पीटर वाहन चालक केशव निकम व महिला पोलीस कर्मचारी योगिता पाटील यांना सदर बाबत माहिती देऊन सदर बॅग चा शोध घेणे कामी रवाना केले असता श्री निकम व महिला पोलीस योगिता पाटील यांनी सदर बॅगमध्ये असलेले मोबाईलचे लोकेशन काढून नवीन पनवेल कडे जाणाऱ्या गुरुद्वारा जवळ स्कूल व्हॅन चालक यांना सापडले असता त्यांच्याकडून सदर बॅग व त्यामधील मौल्यवान वस्तू अशा त्यांच्या प्रयत्नाने अल्प कालावधीत शोधून काढले. सदर बॅग मिळाल्यानंतर वसुधा ओंकार जगे यांच्या ताब्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांचे मार्गदर्शन खाली पनवेल वाहतूक शाखेचे स्टाफ सह त्यांच्या ताब्यात हरवलेली बॅग दिली पोलिसांनी दाखवलेली तत्परता, संवेदनशीलता आणि कार्यतत्परता अनुकरणीय आहे. त्यांच्या या मदतनिधीमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होतो.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## वैनतेय विद्यालयातील विज्ञान जत्रा उत्साहात; विद्यार्थ्यांच्या 402 विज्ञान प्रतिकृतींचे प्रभावी सादरीकरण

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी** : निफाड येथील वैनतेय विद्यालयात आयोजित शालेय विज्ञान जत्रा उत्साहात संपन्न झाली. या जत्रेत विद्यार्थ्यांनी तब्बल 402 विज्ञान प्रतिकृतींचे आकर्षक सादरीकरण करून आपल्या वैज्ञानिक कल्पकतेची उज्वल प्रचिती दिली.गेल्या अनेक वर्षांपासून विद्यालयात विज्ञान जत्रेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी सकाळ सत्रातील 5 वी ते 7 वी आणि दुपार सत्रातील 8 वी ते 10 वीतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. दोन्ही सत्रातील विद्यार्थ्यांनी मिळून एकूण 402 वैज्ञानिक मॉडेल्सची निर्मिती केली.विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा, प्रात्यक्षिक प्रयोगांचा प्रत्यक्ष अनुभव यावा, चिकित्सक बुद्धी विकसित व्हावी तसेच अनुमान–निष्कर्ष काढण्याची प्रवृत्ती वाढावी या उद्देशाने विज्ञान जत्रेचे आयोजन करण्यात आले होते.या जत्रेत विद्यार्थ्यांनी स्लरी



मशीन, सोलर बॅटरी, चंद्रयान, हॅण्ड कुलर, पक्षी निवारण उपकरण, पवनचक्की, एटीएम मशीन, भूकंप मापक यंत्र, वॉटर सेन्सर, कार्बन शुद्धीकरण प्रणाली, रोबोटिक आर्म, स्मार्ट हेल्मेट अशा विविध नाविन्यपूर्ण विज्ञान संकल्पनांचे मॉडेल्स सादर केले.विज्ञान जत्रेचे उद्घाटन न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले आणि मधुकर राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त ॲड. दिलीप वाघावकर, प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, आर. एम. लाहोटी, माजी प्राचार्या मालती वाघावकर, विज्ञान विभाग प्रमुख एस. एन. पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.विज्ञान जत्रेतील मॉडेल्सचे परीक्षण प्रा. बी. एस. काकड, प्रा. व्ही. आर. कुलकर्णी, विनोद परदेशी, एस. व्ही. ससाणे, सी. आर. जाधव, श्रीमती टी. के. राखुंडे, पी. व्ही. भोज, पी. व्ही. वाबळे व पी. बी. गायकवाड यांनी केले.विज्ञान जत्रा यशस्वी केल्याबद्दल सहभागी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे विश्वस्त वि. दा. व्यवहारे, रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड. दिलीप वाघावकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड व नरेंद्र नांदे यांनी कौतुक केले.

# चिखली नगरपरिषद निवडणूक आता तिरंगीतून आता चौरंगी लढत...

### बहुजन समाज पार्टीकडून किशोर कदम उमेदवारीत, काँग्रेसच्या घराणेशाहीवर लोकांची तीव्र नाराजी..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी ता. चिखली**
**सिद्धार्थ धंदरे** : नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत आतापर्यंत भाजप, काँग्रेस आणि राष्ट्रवादी-काँग्रेस या तीन पक्षांमध्ये तिरंगी लढत रंगेल, अशी राजकीय चर्चा होती. मात्र बहुजन समाज पार्टीकडून माजी नगराध्यक्ष पती किशोर कदम यांची उमेदवारी जाहीर झाल्याने ही लढत आता अधिकृतपणे चौरंगी होणार आहे.

बहुजन समाज पार्टीने "वंचित आणि शोषितांचा आवाज" म्हणून कदम यांना पुढे केले आहे. त्यांनी बहुजन चळवळीचे संस्थापक काशीराम आणि उ.प्र.च्या माजी मुख्यमंत्री मायावती यांच्या कार्याचा उल्लेख करत बहुजन समाजाने स्वतःचा नेतृत्वकर्ता



निवडण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्यामुळे बहुजन समाजात या उमेदवारीबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

दुसरीकडे काँग्रेसला मात्र यामुळे मोठा फटका बसत असल्याचे चित्र आहे. अनेक वर्षांपासून काँग्रेसकडून उमेदवार निवडताना बोन्द्रे परिवारालाच प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे काँग्रेसमध्ये घराणेशाही रुजल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे. शहरात कित्येक वर्षे सत्ता उपभोगूनही काँग्रेसने चिखलीमध्ये रस्ते, पाणी, स्वच्छता, बाजारपेठ विकास यांसारख्या मूलभूत सुविधा उभारण्यात अपयश आल्याचा आरोपही जनतेत व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर बहुजन समाज, मुस्लिम समाज आणि अन्य घटकांमध्ये काँग्रेसविरोधात नाराजी वाढली आहे. प्रत्येक समाजात आता "आपला नेता, आपला प्रतिनिधी" असा भाव निर्माण झाला असून त्या दिशेने स्वतंत्र चेहरे समोर येऊ लागले आहेत.

भाजपकडून पंडितराव देशमुख, राष्ट्रवादीकडून निलेश गावंडे, काँग्रेसकडून बोन्द्रे परिवारातील काशिनाथ बोन्द्रे आणि आता बहुजन समाज पार्टीकडून किशोर कदम असे चार उमेदवार मैदानात आल्याने चिखलीची निवडणूक अत्यंत रंगतदार बनली आहे....चौरंगी लढतीमुळे मतदानाचे समीकरण मोठ्या प्रमाणावर बदलण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत...

**"बहुजन समाजाचा वापर, नेतृत्व मात्र बोन्द्रे परिवाराचे" – आरोप**

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आणि माजी आमदार राहुल बोन्द्रे यांच्यावर सर्वाधिक टीका होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काँग्रेसने अनेक वर्षे बहुजन समाज, अल्पसंख्याक आणि मागास घटकांचा मतांसाठी वापर केला; मात्र नेतृत्व नेहमीच बोन्द्रे परिवाराकडेच ठेवले. नगराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, विधानसभा उमेदवारी सर्व निर्णय एकाच कुटुंबापुरते मर्यादित ठेवल्याने घराणेशाहीचे आरोप आणखी तीव्र झाले आहेत. शहरात काँग्रेसने अनेक वर्षे सत्ता चालवूनही रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, बाजारपेठ सुधारणा, स्वच्छता अशा मूलभूत सुविधा उभारण्यात अपयश आल्याचे नागरिकांचे मत आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसविरोधात असंतोष वाढला असून याचा फटका पक्षाला बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे...

# नागाव पाल्हे पूल कोसळण्याच्या उंबरठ्यावर!

### बंदी असतानाही अवजड वाहतूक सुरू; PWD–पोलीस–RTOचा निष्काळजी कारभार उघड"

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा अलिबाग**–मुरुड सहाण बायपासवरील पाल्हे पूल अत्यंत कमकुवत असूनही येथे अवजड वाहनांची वाहतूक दिवसाढवळ्या आणि विशेषतः रात्री सुरूच आहे. पुलावर बंदीचे आदेश असतानादेखील हायवा, ट्रक-ट्रेलर, डंपर, मशीन वाहक वाहने निर्धास्तपणे जात असल्याने मोठ्या दुर्घटनेचा धोका वाढला आहे. शाळांच्या बस, एसटी, स्थानिक ट्रकही याच पुलावरून धावत असल्याने नागरिकांनी भीती व्यक्त केली आहे.मे-जूनमध्ये पुलाची जीर्ण अवस्था समोर आल्यानंतर PWD ने दुरुस्तीचे आश्वासन दिले होते. मात्र सात महिने उलटले तरी लोखंडी सळ्या बाहेर, पायाचे काँक्रीट उखडलेले, तीन पिलरचे मजबुतीकरण अपूर्ण अशीच स्थिती आहे. तरीही अवजड वाहतुकीवर कोणतीही कडक अंमलबजावणी होत नाही. यामुळे प्रशासनाच्या बेफिकीरीचा स्पष्ट नमुना दिसतो.नागरिकांचा आरोप आहे



की PWD फक्त 'पूल कमकुवत' फलक लावून थांबले, पोलीस रात्री तपासणी करत नाहीत आणि RTO (पेण) कडून ओव्हरलोड–अवैध वाहतूक 'गुपित पाकिटात' लपवली जात आहे.यामुळे "जनतेच्या जिवाशी खेळणारा हा निष्काळजीपणा थांबवणार कोण?" असा प्रश्न उपस्थित झाला आहे.बेली पूल कमकुवत म्हणून आधीच बंद आहे. तरीही पाल्हे पूलही असुरक्षित असताना संपूर्ण वाहतूक याच मार्गावर वळवणे हा मोठा प्रशासकीय विरोधाभास असल्याचे नागरिकांचे मत आहे.दरम्यान, नांगरवाडी व वढाव साकव कोसळल्यानंतर आता पाल्हे पूलही त्या दिशेने वाटचाल करतोय.लोखंडी सळ्या बाहेर, हादरे देणारा पुलाचा स्लॅब आणि अवजड वाहनांची धाव रात्रीच्या वेळी यामुळे सावित्री पुलासारखी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.या प्रकरणात नागरिकांनी राज्यपाल देवव्रत आचार्य, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव राजेंद्र कुमार मीना व IG संजय दराडे यांच्याकडे तातडीचे लक्ष वेधले आहे.नागरिकांचे थेट प्रश्न :

**अवजड वाहने त्वरित थांबवण्याची कारवाई कधी?**

दुरुस्ती लांबवणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी ठरवली जाणार का?जीवितहानी झाल्यावरच कारवाईचा धिंगाणा सुरू होणार?नागरिकांचा स्पष्ट संदेश आहे की "निष्क्रिय, संशयास्पद आणि जनतेच्या सुरक्षेशी छेडछाड करणारा कारभार त्वरित थांबवा!"निष्कर्ष आणि मागण्या पाल्हे पूल तात्काळ सुरक्षित करावा अवजड वाहनांच्या वाहतुकीवर पूर्ण बंदी,तिन्ही खात्यांतील निष्काळजी व भ्रष्ट कर्मचाऱ्यांवर कारवाई पर्यायी मार्गाची तत्काळ व्यवस्था नागरिकांनी चेतावणी दिली आहे की पाल्हे पूल कोसळला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी PWD, पोलीस आणि RTOची असेल.

## जानेफळ बस स्टॅन्ड; वाहतुकीची कोंडी कठोर उपाय योजना करण्याची गरज – दबंग ठाणेदार अजिनाथ मोरे

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे** : जानेफळ बस स्टँड; परिसरातील वाढती रहदारी आणि वाहतुकीस होणारा अडथळा लक्षात घेता दबंग ठाणेदार अजिनाथ मोरे यांनी सर्व नागरिक,व्यापारी आणि स्टॉलधारकांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आणि दुकानासमोरील अतिक्रमण तत्काळ काढण्याचे निर्देश दिले आहेत.वारंवार सूचना देऊनही परिस्थिती न सुधारल्याने आता कठोर भूमिका घेण्यात आली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर मुंबई पोलीस कायदा आणि भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत असे ठाणेदार अजिनाथ मोरे म्हणाले. मुख्य सूचना आणि नियम स्टॉल धारकांनी मुख्य रस्त्यावर




स्टॉल लावू नयेत, दुकानदाराने त्यांच्या दुकानासमोर केलेले अतिक्रमण आणि रस्त्यावरील बाकडे,बॅनर पोस्टर,तत्काळ काढून टाकावेत दुकानासमोर रस्त्यावर वाहने लागणार नाहीत याची जबाबदारी संबंधित दुकानदारांची आहे.प्रवासी वाहतूक करणाऱ्या 'काळी पिवळी' टॅक्सी आणि ऑटो रिक्षा चालकांनी बस स्टॅन्ड पासून 200 मीटर अंतरावर प्रवाशांची ने-आन करावी,हॉटेल मालकांना सूचना चहा आणि खानपान हॉटेल चालकांनी दुकानासमोर वाहने उभी करून गप्पा मारणाऱ्या व्यक्तींना जागा खाली करण्यास सांगावे,वाहन चालकांचे नियम ट्रिपल सीट दुचाकी चालवू नये तसेच अल्पवयीन मुला-मुलींनी वाहने चालवतानां आढळल्यास त्यांच्या पालकावर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.सर्व नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना पोलिसांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनाचे पालन करून सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.निमाचे पालन न केल्यास मुंबई पोलीस कायदा कलम 102,117 आणि भारतीय न्याय संहिता कलम 285 तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात येतील अशी सक्त ताकीद अभ्यासू दबंग ठाणेदार आजिनाथ मोरे जानेफळकरांना दिली आहे..

# कबड्डी कुमार गटात शारदा स्पोर्टस तर पुरुष गटात जय हनुमान क्रिडा मंडळ सर्व प्रथम

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)** : बीड जिल्हा कबड्डी स्पर्धेत असोसिएशन आयोजित कुमार गट/पुरुष (खुला )गटाच्या अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे उदघाटन गुरुवार दि.२० नोव्हेंबर रोजी गेवराई येथे आय.टी. आय.मैदानावर सकाळी ठिक १०:००वाजता श्री.भाऊसाहेब नाटकर व श्री.दिपक आतकरे यांच्या शुभ हस्ते उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे कार्यवाह प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते. तर श्री.मधुकर तात्या गर्जे, प्रो.कबड्डीचे खेळाडू



श्री.महारूद्र गर्जे व श्री.वैभव गर्जे यांची उपस्थिती होती. या निवड चाचणी स्पर्धेत जिल्ह्यातून १७ संघाने या सहभाग नोंदवला होता. यात कुमार गटातुन सर्वप्रथम शारदा स्पोर्टस, ॲकाडमी, गेवराई व सर्व द्वितीय यमाई क्रिडामडळ, जातेगांव या संघाने यश मिळविले. तर पुरुष खुला गटात सर्व प्रथम जय बजरंग क्रिडा मडळ, महासांगवी तर सर्व द्वितीय शारदा स्पोर्टस ॲकाडमी, गेवराई या संघाने यश मिळविले. या स्पर्धेसाठी पंच म्हणुन प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे, श्री. अर्जुन गर्जे, श्री.नितीन गर्जे, श्री. कृष्णा शिर्के, श्री.शुभम कादे यांनी काम केले. या स्पर्धेचे सुत्रसंचलन प्रा.डॉ.वंदन जाधव यांनी केले. तर आभार प्रा.केशव सुर्वे यांनी मानले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.केतन गायकवाड व प्रा. पापाजी चव्हाण, श्री.सिध्देश्वर माने, श्री.श्रीराम इंगळे आदिनी अथक परिश्रम घेतले. या यशस्वी संघाचे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री.श्री.शिवाजीराव दादा पंडित, माजी आ.श्री.अमरसिंह पंडित,श्री.जयसिंह पंडित, अध्यक्ष आ.श्री.विजयसिंह पंडित, युवा नेते श्री.पृथ्वीराजे पंडित, युवा नेते श्री.रणवीर काका पंडित यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# घाटंजी नगरपरिषद निवडणूक: मनोज हामंद यांची काँग्रेसकडून उमेदवारी चर्चेत !

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : घाटंजी शहरातील एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळख असलेले मनोज हामंद यांनी आगामी निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी स्वीकारली आहे. जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशी लढाई असताना, एका सामान्य घरातील कार्यकर्त्याला जनतेने आता पाठिंबा देण्याची गरज आहे, अशी चर्चा शहरात सुरू आहे.

**२०१६ च्या निवडणुकीतील खडतर लढत**

सन २०१६ मध्ये झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत मनोज हामद यांचा अवघ्या २५ मतांनी पराभव



झाला होता.त्यांनी एका मातब्बर नेत्याच्या बंधूंना कडवी टक्कर दिली होती. या अटीतटीच्या लढतीमुळे संपूर्ण शहरात चर्चा झाली होती.

**आरोग्य सेवेतील महत्त्वाचे कार्य**

पराभवानंतरही मनोज हामंद यांनी रुग्णसेवेचे व्रत घेतले आहे आणि गेल्या १० ते १५ वर्षांपासून ते सातत्याने हे कार्य करत आहेत. ते एक रुग्णसेवक म्हणून रुग्णांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. या रुग्णसेवेमुळे घाटंजी शहरात त्यांचे नाव उज्वल झाले आहे.

**काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी**

भारतीय जनता पक्षाने काही धनिक लोकांना शहराध्यक्ष पद दिल्यानंतर, मनोज हामंद यांनी कोणतीही तडजोड न करता, स्वतःचा मार्ग निवडण्याचा ठाम निर्णय घेतला. त्यांनी यावेळची उमेदवारी काँग्रेस पक्षाकडून स्वीकारली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे काँग्रेस पक्षात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून, विजयाकडे त्यांची घोडदौड सुरू असल्याचे दिसत आहे. त्यांचा हा विजय निश्चितच सुकर होईल, अशी चर्चा जनतेतून होत आहे. त्यांचे नाव 'अलौकिक' असल्याने, त्यांच्या कार्यकर्तृत्वाने ते जनतेचा पाठिंबा मिळवतील, असा विश्वास कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.

**समाजातील सक्रिय सहभाग**

मनोज हामंद यांचा समाजातील प्रत्येक सण-उत्सवात आणि कार्यक्रमात सक्रिय सहभाग व पुढाकार असतो, आणि तो कोणत्याही धर्माचा असो. 'एका सामान्य माणसाला आता सेवा करण्याचे फळ देण्याची गरज आहे,' असे त्यांचे समर्थक म्हणत आहेत.उमेदवारीची नोंद: त्यांचे प्रभाग क्रमांक ८ मधून उमेदवार म्हणून नाव अपेक्षित आहे.

## सरकारी योजनांची माहिती मिळणार आता एका क्लिकवर..

### कैलास देवकर तालुका कृषी अधिकारी यांची माहिती...

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे** : मालेगाव कृषी विभागाने विकसित केलेले 'महाविस्तार एआय' हे अत्याधुनिक मोबाईल ॲप शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.हवामान अंदाज,रोगनिदान, बाजारभाव,सरकारी योजनांची माहिती एका क्लिकवर मिळणार आहे.मालेगाव तालुका कृषी अधिकारी कैलास देवकर यांनी ही माहिती दिली आहे,ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज मिळत नसल्यामुळे पेरणी,फवारणी, काढणी, यासारख्या कामांमध्ये अनिश्चितता निर्माण होत असते, मात्र 'महाविस्तार एआय' ऍप द्वारा मिळणारे रिअल टाईम हवामान अपडेट्स आता त्यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहेत,तापमान आद्रता,



वाऱ्यांचा वेग,पावसाचा अंदाज, यांसह पुढील शेतकऱ्यांसाठी हे ॲप अत्यंत उपयुक्त ठरत आहे,अशी माहिती मालेगाव तालुका कृषी अधिकारी सन्माननीय कैलास देवकर यांनी दिली आहे.माहिती देताना ते म्हणाले की शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोर मधून महाविस्तार एआय' ॲप डाऊनलोड करून घ्यावे,काही दिवसांचे वातावरण या ॲपमध्ये सहज उपलब्ध आहे.पिकावरील रोग ओळखण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. शेतकरी फक्त पिकांचा फोटो अपलोड करताच क्षणार्धात रोगनिदाणासह उपचारांचे मार्गदर्शन मिळते,चुकीची फवारणी किंवा अयोग्य औषध योजनांमुळे होणारे नुकसान यामुळे मोठ्या प्रमाणात टळत आहे.बाजारभावाची अद्ययावत माहिती अत्यंत आवश्यक असते. मात्र अनेक शेतकऱ्यांना ही माहिती वेळेवर मिळत नाही या समस्येवर उपाय म्हणून ॲपमध्ये प्रमुख बाजारपेठांचे दैनिक बाजारभाव देण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकरी आपला माल कोणत्या दिवशी आणि कोणत्या बाजारात विकावा याचे नियोजन अधिक प्रभावीपणे करू शकतात अशी माहिती कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मालेगाव आदरणीय कैलास देवकर यांनी दिली आहे..

# "नाव्हाशेवा वाहतूक शाखेकडून विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक सुरक्षिततेचा जागरूकतेचा संदेश"

**दैनिक युवक आधार**
**सायली साळुंके उरण प्रतिनिधी** : उरण तालुक्यातील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे तसेच उरण विद्यालय, नवी मुंबई येथे नाव्हाशेवा वाहतूक शाखेमार्फत वाहतुकीच्या नियमांबाबत व्यापक प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वाढत्या अपघातांची संख्या, बेफिकीर वाहनचालकांची वाढती प्रवृत्ती आणि किशोरवयीन मुलांमध्ये नियमांची जागरूकता कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम विशेष ठरला.

२१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.१५ ते १२.०० या वेळेत झालेल्या या प्रबोधन सत्रात सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व, त्याचे पालन केल्याने जीवित सुरक्षिततेत होणारी वाढ, तसेच समाजासाठी जबाबदार नागरिक म्हणून वर्तनाची गरज याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

**प्रबोधनादरम्यान खालील महत्त्वपूर्ण मुद्दे विशेषपणे अधोरेखित करण्यात आले—**

1. १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी वाहन चालवू नये, अन्यथा ते कायद्याने गुन्हा मानला जातो आणि अपघातांचा धोका अधिक वाढतो.

2. लर्निंग लायसन घेतल्यानंतर डबल सीट वाहन न चालविण्याचे नियम विद्यार्थ्यांना पटवून सांगण्यात आले. आवश्यकता भासल्यास पक्का लायसनधारक मागील सीटवर उपस्थित असणे अत्यावश्यक असल्याचे सांगण्यात आले.

3. दोनचाकी वाहन चालवत असताना हेल्मेट आणि चारचाकी चालवताना सीट बेल्ट हे जीव वाचवणारे संरक्षण असल्याचे उदाहरणांसहित स्पष्ट करण्यात आले.

4. रस्त्यावरील सिग्नल जंप, ट्रिपल सीट, आणि रॉंग साईडने वाहन चालवणे यासारख्या धोकादायक वर्तनामुळे केवळ स्वतःचा नव्हे तर इतरांचाही जीव धोक्यात येतो, याची जाणीव करून देण्यात आली.

5. विद्यार्थ्यांनी स्वतःसोबतच आई-वडिलांना नियमांचे पालन करण्यास प्रेरित करणे, हा सामाजिक जबाबदारीचा भाग असल्याचे सांगण्यातआले.या कार्यक्रमास व. पो. नि. श्रीमती गलांडे, तसेच प्राध्यापक श्री साळुंखे सर आणि श्री पाटोळे सर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तिघांनीही समजून घेऊन सविस्तर उत्तरे दिली.कार्यक्रमादरम्यान वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी विविध प्रत्यक्ष उदाहरणे, दैनंदिन आयुष्यातील घडामोडी,




तसेच अपघातांच्या घटनांमागची वास्तविक कारणे विद्यार्थ्यांसमोर मांडली. त्यामुळे सत्र अधिक प्रभावी व विचारप्रवर्तक ठरले.शाळेच्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांची शाळेत वेळोवेळी आवश्यकता असल्याचे सांगत वाहतूक शाखेचे आभार मानले. उरण परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये वाहतुकीबाबत जागरूकता वाढविणारा, सुरक्षिततेचे भान निर्माण करणारा हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

# मोदी-शहांच्या 'राज्यपाल मॉडेल'ला न्यायिक संरक्षण; अमर्याद हस्तक्षेपाला 'बूस्टर' देणारा सर्वोच्च निर्णय!

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** भारतीय संविधानाच्या संघीय तत्त्वाच्या मूलभूत रचनेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. प्रेसिडेंशियल रेफरन्स (विशेष संदर्भ क्र. १/२०२५) अंतर्गत दिलेल्या मतात कोर्टाने स्पष्ट केले आहे की, राज्यपाल किंवा राष्ट्रपतीला विधेयकांच्या मंजुरीसाठी कोणतीही कालमर्यादा लादता येत नाही आणि 'डीम्ड असेंट' (स्वयंचलित मंजुरी) ही संकल्पना संविधानात अस्तित्वात नाही. सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठाने (सूर्यकांत, विक्रम नाथ, पी.एस.नरसिम्हा आणि ए.एस. चांदुरकर) हा निर्णय दिला असला तरी, तो विधिशास्त्रीय व्याख्येच्या चौकटीत राहूनही राजकीय दुरुपयोगाला वाव देणारा आणि राज्य सरकारांच्या संसदीय स्वायत्ततेच्या विरोधात जाणारा आहे. हा निर्णय संविधानाच्या कलम २०० आणि २०१ च्या मूलभूत साराला धक्का देणारा असून, केंद्र-राज्य संबंधांमधील विद्यमान तणावाला आणखी बळकटी देणारा आहे. या निर्णयामुळे केंद्र सरकारला राज्यपालांद्वारे विरोधी राज्यांवर अप्रत्यक्ष नियंत्रण साधण्याची शक्ती मिळाली असून, ती संघीय लोकशाहीच्या मूलतत्त्वांना हानी पोहोचवणारी आहे.

**संवैधानिक व्याख्येच्या सीमांमुळे उद्भवलेली समस्या**

सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात नमूद केले आहे की, संविधानात राज्यपाल किंवा राष्ट्रपतीला विधेयकांवर कारवाईसाठी कोणतीही विशिष्ट कालमर्यादा नमूद केलेली नाही. यामुळे न्यायालयांना अशी मर्यादा लादता येत नाही. हे विधान शब्दशः संविधानाच्या व्याख्येनुसार बरोबर असले तरी, ते संविधानाच्या उद्देश्याकडे दुर्लक्ष करणारे आहे. संविधानाची व्याख्या केवळ अक्षरशः नसून, तिच्या मूलतत्त्वांच्या भावनेनुसार असावी, असे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अधोरेखित केले होते.

तामिळनाडू सरकार आणि राज्यपाल आर.एन. रवि यांच्यातील वाद २०२३ पासून सुरू झाले, जेव्हा राज्यपालांनी डीएमके सरकारच्या १० विधेयकांना मंजुरी नाकारली किंवा राष्ट्रपतींकडे पाठवली. या विधेयकांमध्ये शिक्षण, आरोग्य आणि प्रशासकीय सुधारणांसंबंधीचे महत्त्वाचे कायदे सामील होते. एप्रिल ८, २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारच्या याचिकेवर सुनावणी घेतली आणि राज्यपालांच्या कारवाईला "अवैध आणि मनमानी" ठरवले. न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने कलम १४२ च्या विशेष अधिकारांचा वापर करून या १० विधेयकांना 'डीम्ड असेंट' दिला आणि राज्यपालांनी भविष्यातील विधेयकांसाठी तीन महिन्यांची कालमर्यादा आखून दिली.



यात राज्यपालांना विधेयक मंजूर करणे, नाकारणे किंवा राष्ट्रपतींकडे पाठवणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. राष्ट्रपतींनाही रिझर्व केलेल्या विधेयकांसाठी तीन महिन्यांची मर्यादा लादली होती. हा आदेश तामिळनाडू सरकार आणि सगळ्याच राज्यांसाठी मोठा दिलासा ठरला होता, मात्र या निर्णयाने त्या आदेशाला पूर्णपणे धक्का बसला आहे.

प्रश्न असा निर्माण होतो की, वेळमर्यादा नसल्यास राज्यपाल विधेयके वर्षानुवर्षे थांबवू शकतात का? संविधानाच्या कलम २०० नुसार राज्यपालांना मंजुरी देणे, परत पाठवणे किंवा राष्ट्रपतींकडे पाठवण्याचा अधिकार आहे, पण त्यात समयबद्ध कारवाईची नैसर्गिक अपेक्षा आहे. भारतीय संविधानात राज्यपालाची भूमिका प्रतीकात्मक आहे, राजकीय हस्तक्षेपाची नाही. तरीही, हा निर्णय राज्यपालांना व्हेटो पॉवरसारखे असीमित अधिकार देतो. 'डीम्ड असेंट' नाकारण्याने विधेयकांची विधायी प्रक्रिया नैसर्गिक प्रवाहातून बाधित होते, ज्यामुळे राज्य सरकारांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि केंद्राच्या हस्तक्षेपाला प्रोत्साहन मिळते.

**मोदी-शहा यांचे 'राज्यपाल मॉडेल': संघराज्यावर नियोजनबद्ध प्रहार**

२०१४ नंतर केंद्र सरकारची राज्यांना नियंत्रित करण्याची रणनीती अधिक संघटित व अधिक व्यूहात्मक बनली आहे. मोद-शहा नेतृत्वाने विरोधी राज्यांवर राजकीय अंकुश ठेवण्यासाठी राज्यपाल संस्थेचा वापर अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केला आहे.राज्यपालांच्या नियुक्त्या, त्यांचे वक्तव्य, विद्यापीठ धोरणांमध्ये हस्तक्षेप, विधेयकांना अडथळा हे सर्व एक 'राजकीय ब्लू-प्रिंट'चा भाग असल्याचे दिसते. अनेक राज्यांत राज्यपालांनी साधी संवैधानिक तटस्थता सोडून राज्य सरकारांना सतत अडचणीत आणणारी भूमिका घेतली आहे.

केरळ, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि तेलंगणसारख्या विरोधी पक्ष सत्तेत असलेल्या राज्यांमध्ये केंद्रीय आदेशानंतर राज्यपालांकडून विधेयकांना अडवण्याची स्पर्धाच सुरु होती, आता त्याला न्यायिक संरक्षण मिळाले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही, अनेक राज्यांमध्ये ३० हून अधिक विधेयके राज्यपाल किंवा राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी प्रलंबित आहेत. यात पश्चिम बंगाल, कर्नाटक, तेलंगण आणि केरळ सारखे विरोधी पक्षांचे राज्य प्रामुख्याने सामील आहेत. हे विधेयके प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य आणि प्रशासकीय सुधारणांशी निगडित असून, राज्य सरकारांच्या धोरणांना अडथळा आणत आहेत.

केरळमध्ये राज्यपाल आरिफ मुहम्मद खान यांनी विश्वविद्यालये सुधारणा विधेयके वर्षभरापासून लटकवले, यामुळे राज्य सरकार आणि राज्यपाल यांच्यातील तणाव वाढला होता. तमिळनाडूमध्ये राज्यपाल आर.एन. रवि यांनी १० हून अधिक विधेयकांना राष्ट्रपतींकडे पाठवले. पश्चिम बंगालमध्ये राज्यपाल जगदीप धनखड यांनी ममता बॅनर्जी सरकारच्या १९ विधेयकांना अडवले, ज्यात कायद्याच्या सुधारणांसह सामाजिक कल्याणकारी योजना सामील होत्या. कर्नाटकमध्ये राज्यपाल थावर चंद गहलोत यांनी सिद्धरामय्या सरकारच्या १० विधेयकांना प्रलंबित ठेवले, ज्यामुळे राज्याच्या विकास योजनांना उशीर झाला. तेलंगणमध्येही राज्यपालांनी ३ विधेयके लटकवली असून, हे सर्व उदाहरणे केंद्राच्या राजकीय धोरणांचे प्रतिबिंब आहेत. महाराष्ट्रातही बेकायदेशीर सत्तापालटात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचा मोठा वाटा राहिला आहे. त्याबाबत सर्वोच्च न्यायालयानेही ताशेरे ओढलेले आहे. राज्यपाल आता केंद्राचे हस्तक बनलेले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय संघराज्यीय पद्धत मोडीत काढण्यास हातभार लावणारा आहे. हा निर्णय राज्य सरकारांना केवळ अडचणीत टाकणाराच नाही, तर लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर हल्ला करणारा आहे. विधानसभांमध्ये जनतेचे प्रतिनिधित्व असते, आणि त्या मंजूर केलेली विधेयके राज्यपालांच्या इच्छाधीन ठेवणे म्हणजे अप्रत्यक्षपणे केंद्राच्या हस्तक्षेपाला मोकळीक देण्यासारखे आहे. १९७० च्या दशकातील आणीबाणीप्रमाणे, आज केंद्र सरकार विरोधी राज्यांना राज्यपालांद्वारे नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत आहे. सर्वोच्च न्यायालयाने याला आळा घालण्याऐवजी कायदेशीर पाठबळ दिले आहे, जे संविधानाच्या प्रस्तावनेतील 'संघराज्यीय' तत्त्वाच्या विरुद्ध आहे.

**न्यायिक भूमिकेचे संकुचित स्वरूप: व्याख्यावादाचे जाळे**

सर्वोच्च न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, न्यायालयांना राज्यपाल किंवा राष्ट्रपतींवर वेळमर्यादा लादता येत नाहीत, कारण ते 'राजकीय प्रश्न' आहेत. हे 'राजकीय प्रश्न सिद्धांत' (Political Question Doctrine) चे अनुकरण आहे, जे अमेरिकन न्यायव्यवस्थेतही विवादास्पद आहे. न्यायमूर्ती गवई यांनी १४ प्रश्नांना उत्तर देताना म्हटले की, राज्यपाल विधेयके 'अनिश्चितकाळ' थांबवू शकत नाहीत, पण त्यासाठी कोणतीही अंमलबजावणीची तरतूद नाही. यामुळे विधानसभांना न्यायिक उपाययोजना उपलब्ध होत नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय संविधानाच्या संघीय आत्म्याला धक्का देणारा असून, राजकीय हस्तक्षेपाला प्रोत्साहन देणारा आहे. राज्यपालांना वेळमर्यादा लादणे आणि 'डीम्ड असेंट' ची तरतूद करणे आवश्यक आहे, जसे इंग्लंडमधील 'रॉयल असेंट' प्रक्रियेत आहे. मात्र सर्वोच्च न्यायालय संवैधानिक विधायी प्रक्रिया सुधारणेच्या बाबतीत संकुचित झाला आहे असेच आता म्हणावे लागेल. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्य सरकारांची संसदीय शक्ती आता केंद्राच्या दया-क्षमेच्या भिकेवर अवलंबून रहाणारी होईल. हा निर्णय केवळ विधिशास्त्रीय मुद्दा नाही, तर लोकशाहीच्या भविष्याशी निगडित आहे. "न्यायव्यवस्थेने स्वतःची भूमिका पुनर्स्थापित करून संविधानातील 'संघराज्य व्यवस्था' या मूलभूत संरचनेला तडा जाऊ नये, याची काळजी घेणे आता अपरिहार्य आहे."

**ॲड. राहुल एस. वारे**
**९७६९८६३१२४**

---

# कड्यात रस्त्यावरील चेंबर दुरुस्तीची मागणी

## चेंबरपासुन २० फुटावर अंगणवाडी ; वर्दळीचा रस्ता

**दैनिक युवक आधार**


**बीड आष्टी प्रतिनिधी । मारुती सत्रे :** ता.आष्टी येथील बाराभाईगल्लीतून तेलीगल्लीकडे जाणाऱ्या रस्त्यातच असलेल्या चेंबरचे झाकण तुटून गेले ह्याला जवळपास दोन महिने झाले. येथील महिलांनी संबंधिताकडे तोंडी तक्रार केली होती परंतु अद्याप कोणी कसलची दखल घेतली नाही असे येथील महिलांनी सांगितले. येथील महिलांनी कडा येथील पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद यांना याबाबत माहिती दिली व चेंबर दुरूस्तीची मागणी ग्रामपंचायती कडे करण्याची विनंती केली असता त्याच



ठिकाणांहून महिलांसमोर रहेमान सय्यद यांनी तुटलेल्या चेंबरचे फोटो काढून कडा येथील ग्रामसेवक यांना दिनांक ११ नोव्हेंबर रोजी व्हाट्सअप वर पाठवले व भ्रमणध्वनी वरून संपर्क करून याबाबत सविस्तर माहिती दिली व विनंती केली की येथील महिलांनी सांगितले आतापर्यंत या चेंबर मध्ये चार -पाच जण पडले होते. आणि दोन वेळेस वाहनांचे चाके त्या चेंबर मध्ये गेली होती. आणि या चेंबर पासून २० फुटांच्या अंतरावरच अंगणवाडी आहे म्हणून या चेंबरची दुरुस्ती लवकर करण्याची विनंती केली होती. परंतु आज दिनांक २० नोव्हेंबर पर्यंत ग्रामसेवक यांनी दखल घेतली नाही. हा चेंबर रस्त्यावरच असल्याने ये-जा करतांना अजूनही कोणी पडून अपघात होऊ नये, चेंबर मधून येणारा घाण वास बंद व्हावा यासाठी या चेंबरची लवकरात लवकर दुरूस्ती करण्याची मागणी येथील महिलांनी केली आहे. आज पत्रकार रहेमान सय्यद यांनी ग्रामसेवक यांना भ्रमणध्वनीवरून या चेंबर बाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि आता कर्मचारी पाठवतो व काम लवकरच करून घेतो. आता या चेंबर दुरूस्तीचे काम कधी चालू होईल आणि चेंबरची कधी दुरूस्ती होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

---

# कारची कंटेनरला धडक, दोघांचा मृत्यू



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : भरधाव वेगाने आलेल्या कारने कंटेनरला मागून धडक देऊन झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. तर तिघे जखमी आहेत. हितेंद्र संजय पाटील (वय 22 करावे गाव नवी मुंबई) आणि श्रीनाथ मोहन चंद्रशेखर (वय 22, नेरूळ सेक्टर 6) अशी मृतांची नावे आहेत. या अपघाताप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात हर्ष संतोष पाटील (राहणार सेक्टर 19 नेरूळ) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. 22 नोव्हेंबर रोजी रात्री सव्वा बाराच्या सुमारास काळ्या रंगाची एकसयुवी 700 कार क्रमांक एम एच 43 सीएम 8847 हे वाहन हर्ष संतोष पाटील याने निष्काळजीपनाने चालवून समोरून जात असलेल्या अनोळखी कंटेनरला पाठीमागून धडक मारली आणि भंगारपाडा, पंकज पार्किंग समोरील जेएनपीटी पनवेल येथील रोडवरील ब्रिजवर अपघात झाला. या अपघातात हर्ष संतोष पाटील याच्यासह पाच जण किरकोळ आणि गंभीर जखमी झाले. यातील हितेंद्र पाटील आणि श्रीनाथ चंद्रशेखर यांचा मृत्यू झाला.

---

# भारज बुद्रुक येथे पंचायतराज अभियान अतंर्गत वनराई बंधारा बांधण्यासाठी सरसावले अनेक हात

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी ज्ञानेश्वर कुंडलिक निकाळजे :** जाफ्राबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथील नाल्यावर मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अतंर्गत शुक्रवार दिनांक २१/११/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालया च्या वतीने वनराई बंधारा बांधण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला.यावेळी सरपंच,ग्रामपंचायत अधिकारी,गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी यावेळी श्रमदान केले, या उपक्रमासाठी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे शिक्षक,





**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत वनराई बंधारा बांधण्याचा उपक्रम हाती घेण्यात. आला त्यामुळे जलसंधारणाची सोय होणार आहे, नागरिकांचा चांगलाप्रतिसाद मिळाला श्रमदानात फार मोठी ताकद आहे ती सर्वांनी ओळखावी.**
**(सरपंच सौ,शंकुतलाबाई,रामचंद्र तेलंग्रे भारज बुद्रुक)**

अंगणवाडी सेविका, मदतनीस आदींनी सहभाग नोंदवला पाणी आडवा पाणी जिरवा हे ब्रीद वाक्य लक्षात घेऊन त्यांनी नाल्यावर , किंवा अनेक ठिकाणी वनराई बंधारा उभारला आहे.

---

# परतूर नगरपालिकेची एकही जागा न सोडल्याने आघाडीत झाली बिघाडी...



**दैनिक युवक आधार**

**परतूर -जालना (अशोक ठोके)** : परतूर मध्ये नगरपालिकेच्या निवडणूकिची रन धुमाळी सध्या पहायला मिळत आहे.परतूर नगर पालिकेच्या निवडणुकीत शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी चांगलीच रंगत पहायला मिळाली.दोन दिवसापूर्वी शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट) व वंचित बहुजन आघाडी यांची आघाडी झाली होती तशी पत्रकार परिषद घेऊन अधिकृत घोषणा देखील केली होती,पण प्रभाग क्रमांक 11 साठे नगर मध्ये शिवसेना उबाठा व वंचित बहुजन आघाडीला एकही जागा सोडली नाही त्यामुळे आघाडीला काही अर्थच राहिला नाही. आता शिवसेना उबाठा व वंचित बहुजन आघाडी हे दोघेच युती करून लढणार आहेत.संपूर्ण शहरामध्ये मागासवर्गीय मतदार आहे त्यातच बौद्ध मतदार हा मोठ्या संख्येने असल्यामुळे हि निवडणूक अतिशय निर्णायक ठरणार आहे यात शंका नाही. जर जागा सोडायची नव्हती तर आघाडी करायचीच कशाला अशी चर्चा संपूर्ण शहरामध्ये सुरू आहे. परतूर नगर पालिका आपल्याच ताब्यात ठेवण्यासाठी कदाचित जागा सोडली नाही अशी जोरदार चर्चा सुरू झाली आहे.राज्यात कुठेही होणार नाही अशी आघाडी त्यांनी शिवसेना उबाठा आणि बंचित बहुजन आघाडी सोबत परतूरच्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी सोबत झाली होती.आपल्याला एकही जागा सोडत नाहीत ही बाब शिवसेनेच्या आणि वंचितच्या लक्षात येताच त्यांनी आपआपले उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रभागात जोरदार कॉर्नर बैठका, मोर्चे बांधणी करण्यास सुरुवात केली आहे.त्यांच्या कॉर्नर बैठकाना प्रतिसाद देखील खूप मिळत आहे. आता वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना उबाठा यांच्या सोबतच युती राहील असे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष रामप्रसाद थोरात यांनी सांगितले आहे.

---

# थायलंडचे भदंत सुमंगली सुदधसो यांच्या नेतृत्वात धम्मचारीका व धम्मदेशना रॅलीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा -पवनी तालुक्यातील चिचाळ येथे सकाळी 8.45 वाजता महाकारुणिक बुद्ध विहार चिचाळ येथे पूजनीय भदंत आग सुमंगल यांचे आगमन व स्वागत होणार असून सकाळी 9 वाजता महाकारुणी बुद्धविहार चिचाळ येथून धम्मचारी रॅलीला सुरुवात होणार आहे. सकाळी 10 वाजून 15 मिनिटांनी त्रिरत्न बुद्ध विहार पाथरी पुनर्वसन येथे धम्मचारीकेचे आगमन व धम्म रॅलीचे स्वागत होईल. सकाळी 10.30 वाजता धम्मचारीकेचे शांतीवन बुद्ध विहाराकडे प्रस्थान होईल. त्याचप्रमाणे सकाळी 11 वाजता शांतीवन बुद्धविहार येथे आगमन



व स्वागत होईल. दुसऱ्या सत्रात सकाळी 11 ते 12 वंदनीय भिक्खू यांचे भोजनदान होईल . तिसरे सत्र 12.30 ते 2 वाजे ध्यान साधना होईल. धम्मदेशना दुपारी 2 ते 2.30 वाजेपर्यंत बुद्ध धम्माचे दैनंदिन जीवनात महत्त्व यावर चर्चासत्र. तसेच प्रश्नोत्तराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे .चौथे सत्र दुपारी 2.30 ते 3 वाजता दानपारमिता व आशीर्वाद. व समापन कार्यक्रम होईल.करिता या कार्यक्रमाच्या लाभ घेण्याचे आवाहन शांतीवन बुद्धविहार चिचाळ, सद्धम्म बुद्ध विहार, महाकारूणी बुद्धविहार चिचाळ ,त्रिरत्न बुद्ध विहार पाथरी पुनर्वसन यांनी केलेले आहे.

---

# माहूर तालुक्यातील पाचोंदा येथील दलित महिला दुहेरी हत्याकांडातील कुटुंबियांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार – कॉ.गंगाधर गायकवाड

**दैनिक युवक आधार**

**माहुर :(प्रतिनिधी)सय्यद ईसा** : २० नोव्हेंबर रोजी माहूर तालुक्यातील पचोंदा येथील दोन सख्या जावा असलेल्या दलित कुटुंबातील महिलांची क्रूरपने गळा आवळून खून झाल्याची घटना घडली आहे.यामुळे संपूर्ण समाज हादरला आहे. पोलीस अधीक्षक श्री अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व सपोनि रवी वाहुळे यांच्या पथकाने अवघ्या काही तासात दोन आरोपीना अटक केली आली असून आरोपीनी खून केल्याची कबुली दिली आहे. जलदगती प्रभावाने कार्यवाही केल्यामुळे पोलीस विभागाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

पचोंदा दुहेरी हत्याकांड (डबल मर्डर) प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवावा आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा करावी ही मागणी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड यूनियन्स (सीटू) नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने करण्यात येत असून



पीडित दलित कुटुंबियांना ३० दिवसाच्या आत शासनाने यथोचित मदत करावी यासाठी कॉ.गंगाधर गायकवाड प्रयत्न सुरु केले आहेत. पचोंदा येथील अंतकलाबाई अशोक अडागळे आणि अनुसयाबाई साहेबराव अडागळे या दोघी जावा शेतात कापूस वेचणीचे काम करीत असताना अरोपी दत्ता सुरेश लींगलवार रा.सदोबा सावळी ता. आर्णी जि.यवतमाळ व गजानन गंगाराम येरजवार रा.गंगाजी नगर ता.माहूर जि.नांदेड या दोघांनी खून केला आहे.घटना गंभीर असून सीटू कामगार संघटनेने दुःख व्यक्त केले आहे.

सदरील दलित महिला अत्याचार प्रकरणाची दखल राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोगाने अद्याप घेतली नाही. अनुसूचित जाती,जमाती अत्याचार मदत निधी केंद्र/राज्य शासनाकडून ५ लाख रुपये. मुख्यमंत्री सहायता निधी २ ते ५ लाख रुपये. प्रधानमंत्री राष्ट्रीय सहाय्यता २ लाख रुपये. महिला मृत्यू अनुदान, महिला व बाल विकास विभागाकडून १ लाख रुपये मदत तातडीने मिळणे आवश्यक आहे.परंतु शासकीय यंत्रणा अजून हालचाल करतांना दिसत नाहीत.वरील कायदेशीर मदत शासनाने स्वयंस्फुर्त करणे अपेक्षित आहे.यासाठी सीटू च्या वतीने प्रयत्न सुरु केले असून यदाकदाचित शासनाने दुर्लक्ष केले तर सीटू संघटना पूर्ण ताकतीने पीडित कुटुंबियांना मदत करेल, गरज पडल्यास जनहित याचिका दाखल करणार असे सेंटर ऑफ इंडियन ट्रेड यूनियन्स (सीटू) चे जनरल सेक्रेटरी कॉ.गंगाधर गायकवाड स्पष्ट केले आहे.

# तुम्ही साथ द्या, उत्तर मी शब्दात नाही, कामात देईन – पंडित दादा देशमुख

**दैनिक युवक आधार**

**चिखली तालुका प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे** : चिखली नगरपालिका नगराध्यक्ष पदाकरता भारतीय जनता पक्षाकडून श्री. पंडित दादा देशमुख यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली असून, त्यांच्या नामनिर्देशनानंतर शहरातील राजकीय वातावरणात नवी उत्सुकता निर्माण झाली आहे.

"राजकारण माझं ध्येय नाही, जनसेवा माझं धर्म आहे", "सेवा, समर्पण आणि सत्य — हाच माझा मार्ग" अशा भावना व्यक्त करणारे पंडित दादा देशमुख हे या निवडणुकीतील सर्वात प्रबळ दावेदार मानले जात आहेत.

पंडित दादा यांचा सरळ, साधा आणि विनम्र स्वभाव, समाजातील प्रत्येक घटकात असलेले स्नेहसंबंध, आणि गरजूंसाठी झटन्याची त्यांची तळमळ यामुळे ते सर्वांच्या मनात घर करून बसले आहेत. चिखलीतील अनेकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते असून, अल्पसंख्याक, मागासवर्गीय, ओबीसी, कष्टकरी, व्यापारी, युवा सर्व समाजघटकांमध्ये त्यांना समान आदर मिळतो.

अनेक वर्षे ते कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता जनसेवेत सक्रिय राहिले. कुणाचे घर जळले, कोणाचा अपघात झाला, कोणाला रुग्णालयात मदत हवी, कोणाला शासकीय कागदपत्रांसाठी धडपड करावी लागत आहे— अशा प्रत्येक प्रसंगी "पंडित दादा" हे नाव लोकांच्या मदतीला सर्वात आधी धावून जाणारे राहिले आहे.

भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार,"पंडित दादा हे पक्षाचे निष्ठावंत,



प्रामाणिक आणि तळागाळात काम करणारे कार्यकर्ते आहेत. चिखलीचा विकास हा त्यांचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच पक्षाने त्यांच्यावर विश्वास ठेवत नगराध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे."

त्यांच्या उमेदवारीनंतर चिखलीमध्ये त्यांना उत्तम प्रतिसाद मिळत असून,"प्रत्येक घर, प्रत्येक मन – माझं कुटुंब","लोकांच्या विश्वासावर उभं नेतृत्व... पंडित दादा देशमुख"अशी घोषणा शहरभर ऐकू येत आहे.पंडित दादा यांच्या संयमित स्वभावामुळे, सर्वसमावेशक काम करण्याच्या पद्धतीमुळे आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे ते नगराध्यक्ष पदासाठीच्या स्पर्धेत सर्वात मजबूत उमेदवार ठरत असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.....

# उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत खोपोली महायुतीची शक्तिप्रदर्शन सभा संपन्न

## खोपोली नगरपरिषदेतील नगराध्यक्ष व नगरसेवक महाराष्ट्रातील आदर्श ठरतील –मा.ना.उद्योगमंत्री उदय सामंत

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वार्ताहर** : खोपोली नगरपरिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेना, भाजप व आर.पी.आय. महायुतीच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत महायुतीचे प्रमुख नेते एकत्र येत दमदार शक्ति प्रदर्शन झाले. शनिवार दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ४.०० वा. महाराजा मंगल कार्यालय, खोपोली येथे ही सभा उत्साहात पार पडली. या सभेला उद्योगमंत्री मा. ना. उदयजी सामंत, मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार आप्पा बारणे, कर्जत-खालापूर मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र थोरवे व भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सभेत बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी खोपोली नगरपालिकेत शिवसेना महायुतीचे भगवे वर्चस्व प्रस्थापित होणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त




केला. विकासाच्या अजेंड्यावर महायुती एकदिलाने काम करीत असून येणारी नगरपालिका विजयी होणारच असल्याचे त्यांनी सांगितले. खोपोली नगरीचे नगराध्यक्ष व नगरसेवक महाराष्ट्रातील आदर्श नगरसेवक ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच सर्व उमेदवारांनी महायुती एक कुटुंब म्हणून काम करावे, विरोधकांची रणनीती ओळखून एकजुटीने लढावे, असे त्यांनी मार्गदर्शन केले. विशेषतः एक वर्षानंतर नगरसेवकांच्या कामाचा लेखाजोखा घेऊन काम न करणाऱ्यांना घरचा रस्ता दाखवण्याचे आवाहनही त्यांनी स्पष्ट शब्दांत केले.

याप्रसंगी खासदार आप्पा बारणे यांनी राज्यात महायुती सरकार सत्तेवर असल्याने खोपोली परिसराच्या विकासासाठी कोणतीही कसर ठेवली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. खोपोली रेल्वे स्टेशन आधुनिक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असून लवकरच त्याचे स्वरूप बदलणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. विकासाच्या निश्चयासह त्यांनी जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद कायम राहील असा आत्मविश्वास व्यक्त केला.

सभेत बोलताना आमदार महेंद्र थोरवे यांनी मागील पाच वर्षांत १३५ कोटी रुपयांची विकासकामे पूर्ण केल्याचा उल्लेख केला. खोपोली मतदारांनी सर्वाधिक मताधिक्य देत आमदार म्हणून निवड केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांनी येत्या ३ तारखेला खोपोली नगरपालिकेवर महायुतीचा भगवा फडकणार असल्याचे जाहीर केले. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कुलदीप शेंडे व सर्व महायुती नगरसेवक उमेदवार विजयी करणे ही जनतेची ठाम भावना असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी खोपोली, कर्जत व माथेरान येथे महायुती विजयी होईल, असा विश्वास व्यक्त करत कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

या सभेला भाजपा जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख विजय भाऊ पाटील, आरपीआय शहरप्रमुख नितीन वाघमारे, भाजपा चिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, खालापूर शिवसेना तालुकाप्रमुख संदीप पाटील, खोपोली शहर प्रमुख संदीप पाटील, उपनगराध्यक्ष मोहन औसरमल, शिवसेना महिला आघाडी प्रमुख प्रियाताई जाधव, भाजपा मंडळ अध्यक्ष अजय इंगुळकर, भाजपा महिला अध्यक्षा अश्विनीताई अत्रे, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष भाई शिंदे तसेच शिवसेना, भाजप व आरपीआयचे पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सभेच्या यशस्वी आयोजनाने खोपोलीत महायुतीचा उत्साह आणि आत्मविश्वास अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसले.

# डोंगराळे गावातील त्या घटनेचा अनसिंग मध्ये निषेध

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**अनसिंग:** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात चार वर्षाच्या निरागस चिमुकलीवर झालेला बलात्कार व निर्गुण हत्तेच्या घटने विरोधात संपूर्ण राज्यभर संताप व्यक्त होत असताना वाशिम तालुक्यातील अनसिंग शहरातही तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

जुने बस स्टँड परिसरात नागरिकांनी आरोपी नराधमाचा प्रति कृती पुतळा तयार करून जाळ तीव्र रोष व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर सामाजिक



कार्यकर्ता यश सतीश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रतिनिधी मंडळाने अनसिंग पोलीस स्टेशन मार्फत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस निवेदन देऊन आरोपी तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची ठाम मागणी केली. फास्टट्रॅक कोर्टातील प्रक्रिया आणखी वेगाने पूर्ण करू चिमुकटीला न्याय मिळावा, समाजात निर्माण झालेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर आशा होणारा धम्मांना फाशीची शिक्षा मिळणे अत्यावश्यक आहे. असे स्पष्ट करण्यात आली निवेदनात म्हटले आहे की ही घटना समाजाला हादरवणारी असून अशा विकृत प्रवृत्तीला रोखण्यासाठी कठोर भूमिका घेणे अनिवार्य आहे. यज्ञा बाळाला आणि तिच्या कुटुंबाला न्याय मिळालाच पाहिजे, अशी सर्व अनसिंग करांची एकमुखाने मागणी आहे. निषेध आंदोलनात सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील मोठी उपस्थिती होती. समाजातील कार्यकर्ते विठ्ठल सातव, यश चव्हाण, चंद्रकांत ठाकरे, बालू माल, गजानन कुठे, अनंता लांडगे, सागर सातव, रमेश पुरी, विनोद गाभणे, गजानन नवगणकर, आनंदा ढोके, साईनाथ वाघमारे तसेच सुवर्णकार संघटनेचे सदस्य आणि शहरातील सर्व व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. वाढत्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी राज्याने अधिक कठोर पावले उचलावीत, कठोर शिक्षा देण्यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणी आंदोलनादरम्यान करण्यात आली.

# वाचाळवीर कॉँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा सेलू भाजपाच्या वतीने जाहीर निषेध

**दैनिक युवक आधार**

**परभणी जिल्हा प्रतिनिधी डॉ.गणेश थोरे** : परभणी येथे बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ याची जीभ घसरली त्याने महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या बद्दल अपशब्द वापरल्याबद्दल भारतीय जनता पार्टी सेलू यांच्या वतीने सपकाळ यांच्या गाडीला काळे झेंडे दाखवून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला

यावेळी भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष गणेश



काटकर,श्याम चाफेकर,भागवत दळवे,शिवारीहरी शेवाळे,डॉ. गणेश थोरे ,काका आवटे,लक्ष्मण बोराडे,नानासाहेब वनवे वेंकटेश भिसे,सुदामराव गुटाळ, मनीष भाऊ कदम, भाऊ सोनवणे,विनोद बोराडे ,साईराज बोराडे,कृष्णा काटे,प्रशांत ठाकूर,दीपक कोल्हाळ,मारुती चव्हाण सतीश कापसे , निखिल पहाडे, नितीन चव्हाण विवेक बोंडे,विष्णू इंगोले,गोविंद शिंदे,पप्पू शिंदे,गणेश सवने,अजित मोगल,रमेश तारडे,दामोदर काकडे,सुबोध काकडे,शुभम साळवे,प्रभाकर सुरवसे,बाळासाहेब काजळे,तडवी रहमत,अली खान मुनीर मिर्झा,त्रिंबक पितळे,दत्ता तांबे,माऊली ताठे,संजय भाग्यवंत,दत्ता गिरी,सुंदर बरसाले,रामप्रसाद हजारे,कुणाल बुरेवार,प्रसाद खारकर, रामा डख,प्रभाकर गिराम गणेश भिसे भारतीय जनता पार्टी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

# मोटारसायकलची चावी घरात उघडी ठेवू नका; दुर्लक्षाने अल्पवयीनाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे :** ता.निफाड येथे दारात उभी असलेली मोटारसायकल विनापरवानगी नेल्याने झालेल्या भीषण अपघातात अल्पवयीन तरुणाचा मृत्यू झाला आहे.या प्रकरणी मोटारसायकल मालक दिगंबर बाळु वाघ, रा. खडकमाळेगाव यांनी लासलगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत, त्यांनी घरगुती वापरासाठी बजाज कंपनीची प्लॅटीना मोटारसायकल (एम. एच.१५ ई.वाय.१७१३) घेतली आहे. ती घराच्या दारात उभी होती. त्यावेळी मोटारसायकलची चावीही त्यातच ठेवलेली होती. दरम्यान, शेजारी राहणारा तन्मय सोमनाथ जाधव, वय १७ हा कोणालाही



न सांगता मोटारसायकल घेऊन लासलगावकडे निघाला. वाहन चालवण्याचा पुरेसा अनुभव नसल्याने खाणगाव रोडवरील वळणावर वेग नियंत्रित करू न शकल्याने मोटारसायकल घसरली व रस्त्याच्या नालीत जाऊन पडली. या गंभीर अपघातात तन्मयच्या डोक्यास, तोंडास, छातीस व कमरेस गंभीर दुखापत झाली असून उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. तसेच अपघातात मोटारसायकलचे मोठे नुकसान झाले आहे असा आरोप केला आहे. त्यांचे फिर्यादीवरून मयत युवकाच्या विरोधात गु.रं.नं.२६२/२०२५ भा.न्या. संहिता कलम १०६ (१), २८१, १२५(अ) १२५ (ब), मो.वा.का.क १८४, १८१, १,३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा.उत्तम गोसावी अधिक तपास करीत आहेत.

## चिखली नगरपालिका नगराध्यक्ष पदाचे भाजप उमेदवार श्री. पंडित दादा देशमुख यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची भव्य प्रचार सभा निश्चित!




**दैनिक युवक आधार**

**चिखली प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे**

दिनांक : 25 नोव्हेंबर 2025

वेळ : दुपारी 1.00 वाजता

स्थळ : चिखली,चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले पाटील यांच्या नेतृत्वात आणि नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पंडितराव देशमुख यांच्या केंद्रस्थानी होणारी ही सभा चिखली नगरपरिषद निवडणुकीतील सर्वात मोठी आणि निर्णायक सभा ठरणार आहे.या सभेमुळे चिखलीतील राजकीय वातावरण तापण्याची पूर्ण शक्यता असून, भाजपची ताकद दाखवण्यासाठी ही सभा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.भाजपच्या तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट उसळली असून पंडित दादा देशमुख यांच्या प्रचाराला जोरदार गती मिळणार आहे.

# आनंद सांडू यांच्या "क्षण... सोनेरी, रुपेरी आणि काटेरी पुस्तकास पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई:- (प्रमोद तरळ)** : चेंबूर स्थित वास्तव्यास असलेले प्रसिद्ध साहित्यिक व दत्तात्रेय कृष्ण सांडू प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंद इंदिरा श्रीधर सांडू यांना त्यांच्या क्षण.. सोनेरी रुपेरी आणि काटेरी या पुस्तकास नाट्यश्री साहित्य कला मंच गडचिरोली (रजि.) यांच्या वतीने राज्यस्तरीय महामृत्युंजय वाड्मय पुरस्कार २०२५ हा पुरस्कार जाहीर झाला आहे

सदर पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि ७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभागृह,बस स्टॉप जवळ, शिवाजी कॉलेजच्या समोर, धानोरा रोड, गडचिरोली येथे संपन्न होणार आहे पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असून मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान




करण्यात येणार असल्याचे नाटयश्री साहित्य कला मंचच्या वतीने मा.चुडाराम बल्हारपुरे यांनी श्री सांडू यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे

# वाकद परिसरात दिवसा थ्री–फेज विजेची मागणी तीव्र

## शेतकऱ्यांचा जीव धोक्यात; बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे दिवसा वीजपुरवठ्याची गरज

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे :** निफाड तालुक्यातील वाकद, कानळद व शिरवाडे परिसरात बिबट्यांचा वाढता वावर गंभीर स्वरूप धारण करत आहे. दररोज चार ते पाच बिबटे नजरेस पडत असल्याचे ग्रामस्थ सांगत असून, जनावरांवर तसेच नागरिकांवर झडप घालण्याच्या घटनांतही वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात दोन बिबटे पकडले असले तरी अजूनही परिसरात बिबटे असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे.

दरम्यान, वीज मंडळाकडून सध्या फक्त रात्रीच्या वेळेसच थ्री-फेज वीजपुरवठा केला



जात असल्याने शेतकऱ्यांना शेतीसाठी रात्रीच्या वेळी धोका पत्करून शेतात जावे लागत आहे. बिबट्यांच्या दहशतीच्या पार्श्वभूमीवर हे अत्यंत धोकादायक असल्याने दिवसा थ्री-फेज वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.

या मागणीसाठी संबंधित ग्रामपंचायतींनी ठराव मंजूर केला असून, त्यानुसार कानळद येथील कनिष्ठ अभियंता प्रदीप भालेराव यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देताना वाकद येथील सुनील गायकवाड, रमेश बडवर, सतीश गायकवाड, प्रमोद बडवर, साहेबराव बडवर, सतीश बडवर, भाऊसाहेब शिंदे, राजेंद्र गायकवाड, दीपक बच्छाव, राहुल बडवर, कैलास गायकवाड यांच्यासह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेतकऱ्यांनी दिवसा थ्री-फेज वीजपुरवठा तात्काळ सुरू करून जीविताला धोका निर्माण करणारी परिस्थिती दूर करण्याची मागणी केली आहे.

# खोपोलीत आमदार महेंद्र थोरवे व प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत विविध कार्यालयाचे उद्घाटन, महायुतीचा प्रचार सुरु

## बाजारपेठेत महायुतीच्या निवडणूक प्रचाराचा झंझावात ...

**दैनिक युवक आधार**

**खोपोली वार्ताहर** : शुक्रवार दि. 21 नोव्हेंबर रोजी शिवसेना भाजप व आर. पी. आय. महायुतीचे उमेदवारांच्या खोपोली शहरातील शिळफाटा उदय विहार ,कृष्णा नगर, मोगलवाडी रोड,लक्ष्मी नगर ,बाजारपेठ खोपोली. अश्या विविध प्रभागात निवडणूक प्रचार कार्यालयाचे उदघाटन आमदार महेंद्रशेठ थोरवे व आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महायुती नगराध्यक्ष उमेदवार कुलदीपक शेंडे व सर्व युतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रचार रैलीत शहरातील जनतेचा मोठा पाठिंबा पाहता



महायुति मध्ये मोठा उत्साह व जल्लोषाचे वातावरण पहायला मिळाले.खोपोलीतील व्यापाऱ्यांनी महायुतीच्या पक्षश्रेष्ठींशी यावेळी विविध विषयांवर महत्वपूर्ण चर्चा केली त्यावेळी नगरसेवक पदाचे उमेदवार इंदलमल खंडेलवाल, सोनिया रुपवते,व्यापारी संजय तन्ना, प्रकाश बिनेदार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.शहरातील अल्पसंख्याक समाजातील मोठा वर्ग तसेच अनेक सामजिक व अन्य संस्थेचे प्रतिनिधी सदस्य ,महिला भगिनी,ज्येष्ठ नागरीक यावेळी रैली मध्ये लक्ष वेधणारे ठरले.यावेळी निवडणूकीतील संघटनात्मक निर्णय व नियोजन करीत भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,निवडणूक निरीक्षक प्रकाश बिनेदार ,सुनील घरत , निवडणूक अल्पसंख्याक प्रभारी सय्यद अकबर व खोपोली शहर भाजप महायुतीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतलेली पहायला मिळाली.

# खरवली हायस्कूलच्या शिक्षक रुपी ज्ञानकोशाची दोन सोनेरी पानं म्हणजे सौ. उर्मिला दत्तात्रय साळुंके मॅडम आणि श्री. दत्तात्रय साळुंके सर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील खरवली हायस्कूल तथा नूतन माध्यमिक विद्यालय खरवली हायस्कूल च्या शिस्तप्रिय मातृवत्सल आणि विद्यार्थी प्रिय माजी आदर्श शिक्षिका सौ. उर्मिला दत्तात्रेय साळुंके मॅडम यांचे मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाची दु:खद वार्ता समजताच त्यांचा साळुंके परिवार, नातेवाईक, त्यांचे कापडे ग्रामस्थ पोलादपूर तालुका, तसेच त्यांनी ज्या शैक्षणिक संस्थेत ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले ते माणगाव तालुक्यातील नूतन माध्यमिक विद्यालय खरवली तथा खरवली हायस्कूल आजी माजी शिक्षक वृंद आणि खरवली हायस्कूल आजी माजी विद्यार्थी वर्गात दु:खाची शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी साळुंके परिवार, आप्तेष्ट,सगे सोयरे, खरवली हायस्कूल आजी माजी विद्यार्थी



शिक्षक वृंद आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र डॉ. समीर साळुंके, सुनबाई, नातवंडे आणि त्यांच्या सुकन्या,जावई आणि नातवंडे असा उच्च शिक्षित मोठा परिवार आहे. त्यांचे कार्य रविवार दिनांक ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पोलादपूर येथे त्यांच्या राहत्या घरी आयोजित करण्यात आले आहेत. खरवली हायस्कूल च्या माध्यमातून रविवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ४:०० वाजता खरवली हायस्कूल मध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

सुमारे ऐंशी ते दोन हजार च्या द्वी दशकात माणगाव तालुक्यातील खरवली शिक्षण प्रसारक मंडळाच्या नूतन माध्यमिक विद्यालय खरवली हायस्कूल या नामांकित शैक्षणिक संस्थेत आदरणीय सौ. उर्मिला दत्तात्रय साळुंके मॅडम दिनांक २२/०७/१९८० रोजी शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. तत्पूर्वी त्यांचे पती आदरणीय श्री दत्तात्रय साळुंके सर दिनांक ०१/०७/१९६४ रोजी याच खरवली हायस्कूल मध्ये शिक्षक म्हणून रुजू झाले होते. या उच्च विद्या विभूषित ( पती पत्नी ) उभयतांनी खरवली हायस्कूल मध्ये आदर्श शिक्षक म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे व इमानेइतबारे अविस्मरणीय आणि उल्लेखनीय असे ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. त्यांनी आपल्या सेवा काळात प्रचंड मेहनत घेऊन खरवली हायस्कूल ला शैक्षणिक गुणवत्तेच्या उच्यतम शिखरावर नेऊन ठेवले. शालेय विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच शिस्तप्रियता आणि विनम्रता रुजवली.

रायगड जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम समजल्या जाणाऱ्या पोलादपूर तालुक्यातील कापडे गावातील या उच्च विद्या विभूषित आणि सर्व विषयात पारंगत असलेल्या साळुंके उभय आदर्श शिक्षक दांपत्याने शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी अहर्निशपणे खडतर प्रयत्न केले. शैक्षणिक धोरणानुसार एकही विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीत शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून खरवली विभागातील ग्रामीण गोरगरीब पालक आणि विद्यार्थी वर्गाला शिक्षणाचं महत्त्व पटवून देण्यासाठी आणि विद्यार्थी वर्गात शिक्षणा विषयी प्रेम ,आवड ,गोडी, आसक्ती , आत्मियता आणि अभिरुची निर्माण करण्यासाठी किंबहुना त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी या उभयतांनी प्रसंगी पायपीट करत खरवली विभागातील खरवली, साले, उमरोळी, जाधव सुरव,लहाने सुरव, चेरवली, नाईटणे, पेण ,आमडोशी,बोरघर आणि उसर या गावा गावात विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन गृह भेटी दिल्या आणि शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्यांना स्वतः च्या मुलांप्रमाणे प्रेम आणि वागणूक दिली. विद्यार्थ्यांच्या आणि शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत कुठल्याही प्रकारची उणीव राहू नये म्हणून हे उभय दाम्पत्य कायम शाळेच्या मुख्यालयी अर्थात खरवली या ग्रामीण भागात वास्तव्य करून राहिले. आणि त्यांनी खरवली हायस्कूल च्या माध्यमातून तब्बल तीन ते चार दशके ज्ञानदानाचे पवित्र कार्य करुन आपल्या निस्सीम कार्याचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या मौलिक पवित्र ज्ञानदानाच्या कार्याला त्यांचा ऋणी विद्यार्थी पत्रकार विश्वास बळीराम गायकवाड बोरघर, माणगाव आणि सह परिवारातर्फे आदरपूर्वक सलाम. आणि कालकथीत आदरणीय आदर्श शिक्षिका उर्मिला साळुंके मॅडम यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली. आदरणीय सौ.उर्मिला साळुंके मॅडम मराठी गद्य पद्य आणि संस्कृत या विषयांचे अध्यापन करत आणि आदरणीय श्री. दत्तात्रय साळुंके सर संस्कृत, बीजगणित आणि इंग्रजी या विषयांचे अध्यापन करत. संस्कृतचे गाढे विद्वान असलेल्या या दोन्ही उभयतांची अध्ययन अध्यापनाची कला तथा पद्धत अत्यंत अद्भूत अवीट आगळी वेगळी आणि विलक्षण रुची वर्धक होती. दोघेही स्वभावाने अत्यंत प्रेमळ तितकेच कडक शिस्तीचे होते. असे ऋषीतुल्य गुरू आम्हाला लाभले हे आमचे परम भाग्य..

माजी पर्यवेक्षिका आदरणीय साळुंके मॅडम आणि माजी मुख्याध्यापक आदरणीय साळुंके सर यांच्या सेवा कालखंडात विद्यार्थी वर्गात कमालीची शिस्त आणि आदरयुक्त भीती होती. शालेय शिस्तीचा भंग करणाऱ्या विद्यार्थ्यांना वेताच्या घुंगुर काठीचा महाप्रसाद मिळत असे.

सदर शिस्तप्रिय ज्ञानोपासक उभय दाम्पत्यांकडून ज्ञानार्जन करून गेलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उच्यतम पदावर कार्यरत असून माना सन्मानाने जीवन जगत आहेत.

आदरणीय साळुंके मॅडम आणि आदरणीय साळुंके सर यांच्या शिस्तप्रिय संस्कारातून खरवली विभागातील अनेक विद्यार्थी ( पिढ्या ) बॅचेस नूतन माध्यमिक विद्यालय खरवली हायस्कूल च्या माध्यमातून शिक्षण घेऊन स्वताच्या पायावर उभे राहुन संस्कारक्षम झाल्या आहेत. आदरणीय सौ. उर्मिला दत्तात्रय साळुंके यांनी दिनांक १४/०६/ १९९९ रोजी स्वेच्छा निवृत्ती घेतली तर आदरणीय श्री दत्तात्रय साळुंके सरांनी तब्बल ३६ वर्ष प्रदीर्घ ज्ञानदानाचे महान कार्य करुन दिनांक २८/०२/२००२ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सुलेखन - पत्रकार विश्वास बळीराम गायकवाड बोरघर, माणगाव रायगड भ्रमणध्वनी - ९८२२५८०२३२,८००७२५००१२.

# परराज्यातील शिक्षक देणार विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे धडे- महत्त्वाचा व नाविन्यपूर्ण उपक्रम

## शहरातील एज्युव्हीजन आणि न्यू इरा किड्स इंग्रजी शाळेचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर उध्दव सरोदे :** अर्धापूर शहरात व तालुक्यात शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत कमी कालावधी मध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या एज्युव्हीजन प्री-प्रायमरी व न्यू इरा किड्स इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांना परराज्यातील शिक्षक इंग्रजी विषयाचे धडे देणार आहेत.सतत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती व उज्वल भविष्या संदर्भात विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासंदर्भात अर्धापूर शहरातील नामांकित झालेली एज्युव्हीजन प्री प्रायमरी आणि न्यू इरा किड्स इंग्रजी शाळा अग्रेसर असते.अगदी त्याच धर्तीवर आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही पर राज्यातील मूळ इंग्रजी माध्यमातील शिक्षकांचा सहवास लाभावा यासाठी शाळेचे संचालक प्रा.प्रवीण रावते यांनी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणारे परराज्यातील शिक्षक यांचा शाळेत समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.ग्रामीण भागातील



पालकांचाही आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यम शाळेमध्ये शिक्षण देण्यासाठी एक पाऊल पुढे टाकत आहेत.परंतु दर्जेदार व उच्च शिक्षण मिळवण्यासाठी पालक आपल्या पाल्यांसाठी शाळांची निवड करत असतात.विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी संचालक यांनी आपल्या एज्युव्हीजन प्री प्रायमरी आणि न्यू इरा किड्स या शाळांमध्ये इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या परराज्यातील शिक्षकांची निवड केली असून त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी व समजण्यासाठी सुलभ जाईल.त्याच बरोबर विद्यार्थी सहजतेने इंग्रजी बोलू लागतील व शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषे सोबतच इतर विषयांना सुद्धा स्वतंत्र विषय शिक्षक शिकविण्यासाठी आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषे सोबतच इतर भाषा व विषयांनाही परीपक्क करण्याचा मानस आमच्या शाळेचा आहे.विद्यार्थ्यांची शैक्षणिक विकासाबरोबरच शारीरिक व मानसिक विकास करण्यावरही तेवढाच भर शाळेचा असून विविध खेळांची माहिती व सर्वांगीण विकास करण्यासाठी शिक्षकांची नेमणूक केलेली आहे. असे नियोजनबद्ध व योग्य पद्धतीने शिक्षण देऊन विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक तसेच सर्वांगीण विकास घडविण्याची संकल्पना या माध्यमातून राबवत असून नुकतेच कमी काळात शाळेने खूप मोठ्या प्रमाणात यश मिळविले असून या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्व पालकवर्ग,विद्यार्थी व अर्धापूर शहर व तालुक्यातील सर्व नागरिक शाळेचे संचालक प्रा.प्रविण रावते व शाळेचे अभिनंदन व कौतुक करित आहेत.

# श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** दि.22 नोव्हेंबर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. रामशेठ ठाकूर साहेबांच्या 75 व्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन संस्थेच्या अनेक शाखांमध्ये करण्यात आले.दि.22 नोव्हेंबर रोजी या दिनाचे औचित्य साधत संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती. भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात रोल प्ले,स्टॅचू ड्रेस अप, एकपात्री नृत्य,वेशभूषा अश्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.वेशभूषा स्पर्धेचे खास आकर्षण पाहायला मिळाले त्यात अनेक चिमुकल्यांचा




सहभाग असून काहींनी भगतसिंग,राजगुरू,इंदिरा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज झाशीची राणी तसेच खास आकर्षण तर काही चिमुकल्याणी हुबेहूब मा.श्री.रामशेठ ठाकूर साहेबांची देखील वेशभूषा करत सर्वांचे लक्ष वेधले.तसेच स्टॅचू ड्रेस अप साठी देखील लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल,विश्व् रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,भारतमाता,कालिका देवी तसेच अनेकांची प्रतिमा हुबेहूब साकारली काहींनी आपले मदतनिस सफाई कर्मचारी,पोलीस,डॉक्टर,नर्स आदींची भूमिका बजावत सामाजिक संदेश दिले.यात शंभर हुन अधिक स्पर्धेकांनी सहभाग नोंदवत स्पर्धेची शोभा वाढवली. या विशेष प्रसंगी मा.सौ.वर्षाताई ठाकूर ( मेंबर बोर्ड ऑफ कमिटी ज.भ.शि.प्र. संस्था ),मा. ऍडवोकेट श्री.राहुल घरत ( मेंबर बोर्ड ऑफ कमिटी ज.भ.शि.प्र.संस्था ),श्री.सुरेश पाटील,श्री.सुनील पाटील,श्री. मेघनाथ तांडेल,सौ.सीमा घरत तसेच सर्व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.या संपूर्ण स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी श्री.रवींद्र म्हात्रे,श्री. श्रीश म्हात्रे परीक्षक म्हणून उपस्थित होते.याप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन श्री. चंद्रकांत घरत,विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.अनुराधा काठे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सेवासदन लाईफ लाईनच्या माध्यमातून अनेक गरजू व गोरगरीब नेत्र रुग्णांना होतोय लाभ

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर) :** हल्लीच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आणि आकाशाला गवसणी घालणाऱ्या महागाईच्या युगात अनेक गोरगरीब व गरजू नेत्र रुग्णांना आपल्याला नवी दृष्टी प्राप्त होण्याच्या काळजीतून भयमुक्त व काळजीमुक्त होण्याच्या दृष्टिकोनातून आणि "समाजसेवा ब्रीद आमुचे स्वार्थ सुखाची आच नसे, समाजकारणी देह वाहवा एकमात्र हा ध्यास असे"या विचारसरणीचा पगडा घेऊन सध्या सांगली सातारा सोलापूर जिल्ह्याबरोबरच अनेक जिल्ह्यांमध्ये सेवा सदन लाईफ लाईन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल



मिरज मार्फत गावोगावी खेडोपाडी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करून त्यांना शासकीय योजनेतून मोफत शस्त्रक्रियेचे फायदे देऊन औषधोपचाराबरोबरच आरोग्याच्या बाबतीत महत्त्वाच्या बाबी समजावून सांगून एक दिलासा देत असल्याचे जाणवत आहे. याबाबत सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ . रविकांत पाटील, डॉ. साक्षी पाटील यांच्यामार्गदर्शनाखाली डॉ.रवींद्र बाबर, डॉ. लता मोरे अशा त्यांच्या अनेक सहकाऱ्यांच्या माध्यमातून हृदयरोग लघवी आजार, हाडाचे आजार अशा अनेक आजारावरती उपचाराच्या बाबतीत योग्य ते मार्गदर्शन व वेगवेगळ्या शासनाच्या माध्यमातून मोफत उपचार करून एक समाजसेवेचे पथक सध्या जनमानसात सत्कार्य करीत असल्याचे दिसून येत आहे अशी सर्वत्र चर्चा आहे. या त्यांच्या सेवेचा प्रचार व प्रसार सर्व दूर होत असल्याच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळत असून गोरगरीब रुग्णांच्या चांगल्या प्रतिक्रिया ऐकायला मिळत असून त्यांच्या चेहऱ्यावरती सुख समाधान पसरल्याचे बोलले जात आहे.

# श्री शिवाजी विद्यालय मुळावा अंतर्गत मोहदरी येथे गावस्तर पालक सभा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड (मोहदरी) :** पालक सभा म्हणजे विद्यार्थ्यांचे पालक आणि शाळेतील शिक्षक यांच्यात संवाद साधण्यासाठी आयोजित केलेली एक बैठक. महाराष्ट्रात याला 'पालक-शिक्षक संघ' असेही म्हणतात. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने याबाबत मार्गदर्शक तत्त्वे सुद्धा निश्चित केली आहेत पालक सभेचे उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांची प्रगती होणे



विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील प्रगती होणे वर्गातील सहभाग यावर चर्चा करणे सोबतच विद्यार्थी किंवा शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर एकत्रितपणे तोडगा काढणे वैयक्तिक मार्गदर्शन करणे शिक्षकांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या सवयी आणि भावनिक गरजांनुसार वैयक्तिक मार्गदर्शन करणे,शाळेतील नवीन नियम, कार्यक्रम, परीक्षा पद्धती आणि नियोजित उपक्रमांबद्दल पालकांना माहिती देणे म्हणजे च पालक सभा असते त्यानुसार मोहदरी येथील पालकांना शिक्षकांनी विशेष मार्गदर्शन केले त्यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईल टीव्ही पासून दूर ठेवावे, नियमित अभ्यास करून घ्यावा अशी इत्थंभूत माहिती दिली यावेळी श्री शिवाजी शाळा मुळावा चे मुख्याध्यापक धबडगे सर, मंचक आमले सर,गावातील पालक विधार्थी उपस्थित होते.

# संविधान दिनानिमित्त वाजेकर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे केले आयोजन

**दैनिक युवक आधार**

**उरण (नवी मुंबई) :** रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयात राज्यशास्त्र व IQAC च्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.Indian Constitution and Viksit Bharat @2047:(Foundations for Inclusive, Democratic, and Sustainable Nation-Building)

भारतीय संविधान आणि विकसित भारत @२०४७ वरील आंतरराष्ट्रीय ई-परिषद: समावेशक, लोकशाही आणि शाश्वत राष्ट्र-उभारणीसाठी पाया " असे या परिषदेचे शीर्षक व उपशीर्षक असून भारतीय राज्यघटनाचा



अमृत महोत्सव व भारतीय स्वातंत्र्याचा आगामी शतक महोत्सव या अनुषंगाने विकसित भारत ही संकल्पना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ संदीप घोडके यांनी मांडली व त्यास महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माननीय बाळाराम पाटील, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलमधील जेष्ठ सदस्य माननीय रामशेठ ठाकूर व इतर सदस्यांनी मंजूर केलेली ही आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी करण्याकरिता गेल्या दोन महिन्यापासून प्रभारी प्राचार्य डॉ अमोल ठक्कर, आयोजक डॉ संदीप घोडके व सर्व प्राध्यापक वृंद अविरत प्रयत्न करीत आहेत.

बुधवार दिनांक २६/११/२०२५ रोजी दिवसभर ऑनलाइन पद्धतीने चालणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन मुंबई व शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे मा.अध्यक्ष डॉ देवानंद शिंदे यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता संपन्न होत आहे . सदर परिषदेत स्थानिक, विद्यापीठ, राज्य ,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत तसेच या विविध स्तरातून आलेले शोध निबंध सादर केले जाणार आहेत अशी माहिती परिषदेचे सहआयोजक डॉ राहुल पाटील यांनी दिली आहे.

# ग्रामस्वच्छता अभियानात निरगुडी ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**

**निरगुडी ता. हवेली, पुणे प्रतिनिधी**

19 नोव्हेंबर 2025: मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत निरगुडी ग्रामपंचायतीत आज ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमात ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत स्वच्छतेसाठी श्रमदान केले.

अभियानात प्रशासक मा. श्री अब्दुल रजा मुल्ला, ग्रामपंचायत अधिकारी अनिल विघ्ने यांच्यासह माजी उपसरपंच आणि शिवसेना नेते अनिल अण्णा इरले उपस्थित होते. संदीप कदम, संपत कदम, ज्ञानेश्वर कदम, सुरेखा कदम, संजय कदम, सुषमा कदम, सावित्राबाई कदम, अश्विनी कदम, मंदाकिनी गावडे, कविता अडसूळ, सुमन कदम यांच्यासह अनेक ग्रामस्थांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला.

अभियानादरम्यान गावातील मुख्य रस्ते, नाले व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. कचरा संकलन, गवत कापणी तसेच ग्रामस्थांमध्ये




स्वच्छतेबाबत जनजागृतीही करण्यात आली.

ग्रामस्थांच्या स्वयंस्फूर्तीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने एकजुटीची भावना अधोरेखित केली. स्वच्छतेबाबत सातत्याने प्रयत्न करण्याचा संकल्प ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.